REGISTERED N. No.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस.... .... ....८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly .........3 .................. 8 as
Single copy ................................. 4 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 5 JANUARY 1903 NO 1

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ५ माहे जानेवारी सन १९०३ इ० अंक १

( १००० चे वर दर आठवड्यास पाठविले जाते. )

**१० आणं त किं० रु० १५ चें फुकट.**

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकीटांसह हक्काचे सरटीफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा. ) तीं चार तिकिटें दुसऱ्याच विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणाराकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तिकिटांसह ४ सरटीफिकिटें व फुकट चांदीचं पॉकेट वॉच किंवा मिसेस लावण्याचं ८ दिवसाच वाजणारे गेंठ क्लॉक मागवा. अर्थात् दहा आण्यांत १५ रु० चें फुकट !!!

जी. बी नाईक आणि कंपनी.
ठकुद्वार रोड मुंबई.

अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोकप्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह आधा १२ आण्यांत मिळेल, शिवाय प्रत्येक वर्गणीदारांस उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ; पो० गडहिंग्लज;
इ० कोल्हापूर.

विक्रीसतयार.

सोईनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

**कायद्याचीं पुस्तकें**

सिव्हिल प्रोसिजर कोड-आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड – ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड — जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चासुद्धां २८८

म्यानेजर, डेक्कन बुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

नोटीस

बेशमी मारुती वल्लद परशराम कोल्हे राहणार अळवाडी किंवा पळसोद ( देशमुखाचें ) तालुका आकोट यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची गंधर्वाची बायको असून तुम्ही मला दोन वर्षे पासून निराळें केलें आहे. तशी जनरीतीला सोडून मला मारठोक करितां, आणि काहीं तरी कारण दाखवून मला हाकलून देता. तुमच्या मनांतून माझ्याशी संसार करावयाचा नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. मी दोन वर्षां जवळ जवळ दिवस आईबापांच्या घरीं काढले. शेवटीं चार पंचा समक्ष तुम्ही ५० रुपये घेऊन फारकत देण्याचें कबूल केलें. या गोष्टीला सहा सात महिने झाले. तरी तुम्ही लेखी फारकत अजून दिली नाहीं. तुम्हाला द्यावयाचे ५० रुपये रा० इणाजी काळे यांच्या पाशीं घरवर ठेविले आहेत. तुमचा माझ्यावर नवरेपणाचा हक्क राहिला नाहीं. पण लेखी फारकती शिवाय मला दुसरा कोणीकडे घरठाव करिता येत नाहीं. तुम्ही ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत लेखी फारकत आणून द्यावी आणि फारकतीचा मोबदला रुपये ५० इणाजी काळे याजकडून घेऊन जावें असें न केल्यास रितीप्रमाणें कोर्टमार्फत व्यवस्था करण्यांत येईल आणि सर्व नुकसानी तुम्हास भरून द्यावी लागेल. कळावें. तारीख ३१ दिसेंबर १९०२ इसवी

सही

दुळी मर्द मारुती कोल्हे हल्लीं
राहणार पळसोद तालुके
आकोट निशाणी बांगडी.

## आकोल्याचा दरबार

चक्रवर्ती बादशहाच्या राज्याभिषेका संबंधानें सर्व देशभर महोत्सव गेल्या गुरुवारीं करण्यांत आले. प्रत्येक स्थळींचीं वर्तमानें म्हणजे आनंदोत्सवाच्या प्रकारचीं वर्णनें होत. आमच्या प्रांतांतही राजभक्तीचें प्रदर्शन इतर प्रांतांप्रमाणेंच फार जंगी झालें. १ ली जानेवारी हा मंगल दिवस आनंदकार्यामध्यें सर्वत्रांनीं घालविला. या दिवशीं मुख्य कार्यक्रम म्हणजे दरबार, आतषबाजीचे प्रकार, गोरगरिबांस अन्नदान, विद्यार्थ्यांचे मेळे जमवून त्यांस मेवामिठाई देणें इत्यादि गोष्टींचा समावेश होय. वर्गणीच्या लहानमोठ्या प्रमाणें हा आनंदोत्सव लहानमोठ्या प्रमाणावर करण्यांत आला.

आमच्या शहरीं मे. बी. क्रे साहेब असिस्टंट कमिशनर यांच्या अध्यक्षते खालीं दरबार ... ते तारखेस बरोबर दोन प्रहरीं भरला होता. युरोपियन व नेटिव अधिकारी, मुनसिपल व जिल्हा बोर्ड यांचे सभासद, व्यापारी, वकील व इतर धंदेवाली मंडळी पुष्कळ जमली होती. मे. क्रे साहेबांनीं इंग्रजींत समयोचित संभाषण केलें. त्यांत त्यांनीं या समारंभाचें महत्त्व सांगून हा समारंभ करण्याची परवानगी आमच्या बादशहांनीं दिली हा त्यांनीं इंडियावर विशेष राजकृपा केली आहे असें सांगितलें, तें भाषण येणें प्रमाणें:—

"Gentlemen,

In the absence of the Deputy Commissioner, Kumar Shri Harbhamji Ravaji at Delhi, it has fallen to my lot to read the proclamation of His Majesty the King Edward VII Emperor of India. The accession of a new sovereign to the throne of the British Empire is, at any time, an event of more than passing importance. On the present occassion it has to my mind a deeper significance than usual. It symbolizes the continuance of all that was best in the Victorian era which we have just left behind us. That era while not without its triumphs of arms, will go down to posterity as an era of peace. The marvelous progress of science has increased the comfort of the well-to-do and alleviated the misery of the poor and the progress in the science of Government has been no less. Only two years ago at the time of the death of Her late Majesty Queen Victoria it seemed as if the limit had been reached: Standing on the threshold of a new century with South Africa devasted by war, India by famine, and our beloved Queen no more, what wonder if the future seemed dark. But now the sun has broken through the clouds and we may confidently look forward to a long era of peace and prosperity not less than we enjoyed during the reign of Queen Victoria. In his declaration of 23rd. January 1901, His Majesty announced his intention of working for the good and amelioration of his people; and the Delhi Durbar renews the pledge to the people of India. The compliment of a public announcement as at Delhi has been extended to no other part of the King's dominions and proves conclusively the very sincere interest taken by His Majesty in all that concerns India. Gentlemen, I thank for your attention."

या भाषणा नंतर इंग्रजींत बादशहाचा जाहिरनामा वाचण्यांत आला त्याचें मराठी भाषांतर रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर, सिव्हिल जज्ज साहेब यांनीं केलें. हा तर्जुमा येणें प्रमाणें:—

## जाहिरनामा

( चक्रवर्ती बादशहाचे राज्यारोहणाच्या समारंभाचे महोत्सव हिंदुस्थानचे राज्यांत करण्यासाठीं दिवस नेमण्या करितां चक्रवर्ती बादशहा कडून आलेला. )

### महाराजे बादशाहा एडवर्ड साहेब

ज्या अर्थी- परलोकवासी आमच्या व्हिक्टोरिया महाराणी साहेब, ज्यांचें स्मरण आम्हांस परमप्रिय होते त्या तारीख २२ जानेवारी इसवी सन १९०१ रोजीं स्वर्गवासी झाल्या आणि नंतर आम्ही सातवे एडवर्ड हें नाम व पदवी धारण करून सिंहासनारूढ झालों आणि ईश्वरकृपेनें ग्रेट ब्रिटन व आयरलंडचे राजे, व धर्मसंरक्षक व हिंदुस्थानचे बादशाहा आम्ही झालों.

आणि ज्या अर्थी-आमच्या कारकीर्दीच्या पहिले वर्षी, ता. २६ जून आणि तारीख १० डिसेंबर इसवी सन १९०१ रोजीं आम्ही ईश्वरकृपेनें व ईशप्रसादानें राज्याभिषेक समारंभाचा महोत्सव तारीख २६ जून इसवी सन १९०२ रोजीं करण्याची मर्जी जाहीर केली;

आणि ज्या अर्थी ईश्वरकृपेनें गेले आगष्ट महिन्याचे ९ वे तारखेस शनिवारीं सदरहू समारंभाचा महोत्सव आम्हांस करितां आला;

आणि ज्या अर्थी सदरहू समारंभाच्या महोत्सवाची सार्वत्रिक ख्याति आमचे हिंदुस्थानचे सर्व प्रिय प्रजेंत व्हावी अशी आमची इच्छा व मर्जी असल्यावरून; आणि आमचे गव्हरनर, लेफ्टनेंट गव्हरनर, प्रांतिक मुख्य अधिकारी व आमचे संरक्षणा खालीं असलेले हिंदुस्थानचे संस्थानांतील राजे रजवाडे, व सरदार आणि हिंदुस्थानचे राज्यांतल्या सर्व प्रांतांतील प्रतिनिधी या सर्वांस ह्या राज्यारोहण समारंभांत सामील होण्यास संधी मिळावी अशी आमची इच्छा व मर्जी असल्या वरून.

आम्ही आतां ह्या बादशाही जाहिरनाम्यानें आमची मर्जी प्रगट करितों आणि ह्या लेखावरून आमचे विश्वासु व प्रिय सल्लागार केडलस्टनचे जार्ज नाथेनिअल लार्ड करझन साहेब आमचे प्रतिनिधी व हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांस,

असा हुकूम फरमावितो कीं दिल्ली येथें तारीख १ पहिली जानेवारी इसवी सन १९०३ रोजीं, आमचें राज्यारोहणसमारंभ विधि पूर्ण झाला हें कळविण्या करितां त्यांनीं बादशाही दरबार भरवावा, आणि आम्ही असेंही फर्मावितों कीं त्या दरबारांत हा जाहिरनामा सर्वांच्या माहिती करितां वाचला जावा.

तारीख १ ली अक्टोबर इसवी सन १९०२ रोजीं आमच्या राज्याच्या दुसऱ्या

वर्षीं हा लष्ट सट जमसव राजवाड्याच दरबारांत झाला असें

अमन्न म्हाराज शा

---

त्या नत महत्वद हवा र्नी

जिल्हा

श्रीमंत

दीर्घायु

लाभोत अशा विषयीं इच्छा

कांहीं मुल आण पोलिसांची व केऊन पान सुपारी, अत्तर गुलाब वगैरे वटण्यांत आलें आणि दरबार बरखास्त झाला.

---

## वऱ्हाडसमाचार

मित्ती पौष शुद्ध ७ शके १८२४

---

## कला प्रदर्शन

( इंडियन कलाकौशल्याच्या पदार्थांचा दिल्लीस केलेला संग्रह )

गेल्या मंगळवारीं दिवसा साडे अकरा वाजतां लार्ड कर्झन साहेबांनीं हें प्रदर्शन उघडलें तेव्हांचा समारंभ मोठा अप्रतिम होता. देशीं कलाकौशल्यांचें असें उत्तम प्रदर्शन पूर्वी कधींच झालें नव्हतें. या दिल्ली दरबाराच्या लोकोत्तर समारंभामध्यें चिरस्मरणीय अशी ही प्रदर्शनाचीच मुख्य गोष्ट होय. लार्ड कर्झन युरोपिअन आहेत तरी पण त्यांनीं या बाबतींत इंडियाच्या उत्तमोत्तम देशभक्तालाही मागें टाकिलें. लार्ड कर्झन यांनीं या प्रदर्शनामुळें हा देश आपलासा करून सोडला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत देशी कारागिरी विषयीं जो भक्तिभाव व्यक्त केला आहे आणि चार हितबोधाच्या गोष्टी म्हणून, आमच्यांतील संस्थानिकांस व श्रीमंत मंडळीस देशी कारागिरीचा अभिमान बाळगण्यास, उपदेश केला आहे तो सर्वांनीं ध्यानांत धरण्यासारखा आहे. दिल्लीच्या प्रदर्शना विषयीं लार्ड कर्झन साहेबांचे सर्व जण धन्यवादन गातील.

लार्ड कर्झन साहेबांच्या संभाषणाचा मुख्य आशय असा कीं, या दिल्ली दरबाराच्या निमित्तानें सर्व प्रांतांतील मुख्य मुख्य लोक, संस्थानिक, वरिष्ट अधिकारी, व जगांतील सर्व राष्ट्रांचे प्रसिद्ध पुरुष एकत्र जमणार; तेव्हां अशा मंडळीस इंडियांतील विख्यात कलाकौशल्याची ओळख सर्वत्रांस करून द्यावी असा मी मनात हेतु धरला व इंडियन कलाकौशल्याला उतरती कळा लागली असून उत्तरोत्तर याचा व्हासच होत आहे म्हणून त्याचें प्रदर्शन करून त्याला उर्जित काळ आणण्याचा हा प्रयत्न केला आहे.

सार तीन गोष्टी या प्रदर्शना संबंधानें

फक्त देशी कलाकौशल्याच्या पदार्थांचा संग्रह केलेला आहे; या देशाच्या औद्योगिक व सांपत्तिक वैभवाचें प्रदर्शन येथें नाहीं. शोभा आणि मनोहरपणा आणण्यासाठीं भपकेदार खनिज पदार्थ, उंची उंची सागवान, कातडीं वगैरे जिन्नसांचाहि संग्रह केला नाहीं.

प्रदर्शनांत दुसरा विशेष असा आहे कीं, युरोपिअन वस्तूंना येथें स्थल दिलेलें नाहीं. युरोपिअन भपका अगदीं काढून टाकला आहे तथापि इंग्रजी गोष्टींचाच प्रसार हात असल्यामुळें नेटिव कारागिरांनीं इंग्रजी नमुन्यावर केलेलीं चहाचीं भांडीं वगैरे नानाविध वस्तु येथें मांडण्यात आल्या आहेत.

तिसरा विशेष हा कीं, या प्रदर्शनांत फक्त उत्तम व मौल्यवान वस्तूंचाच संग्रह केलेला आहे. देशी कापड, पितळेच्या मूर्ती व इतर हलके सलके पदार्थ येथें सांपडणार नाहींत. सोनेरी, व रुपेरी नक्षीदार कारागिरी; रत्नखचित दागदागिन्यांची कुसरी, लांकूड, हस्तीदंत व पाषाण या वरील खोदीव कामाचा उत्कृष्टपणा; मृत्तिकेचीं भांडीं, कवलें वगैरे मधील कुंभाराचें कौशल्य, गालिचे, सतरंजा, चित्रपट इत्यादिकांतील अप्रतिम हुन्नर; मखमल, रेशीम, किनखाब, कलाबतु इत्यादिकांत दिसणारे कळसें प्राविण्य या सर्वांचें प्रदर्शन उत्कृष्ट व्हावें असा मुख्य हेतु आहे. उत्कृष्ट शिल्प विद्येला चांगला आश्रय व प्रोत्साहन देण्याचा मूळचा संकल्प आहे.

इंडियन कलाकौशल्यांतील उत्तम भाग दाखविण्यासाठीं राजेरजवाड्यांकडून कांहीं पदार्थ मुद्दाम मागविले आहेत, आणि निरनिराळ्या पदार्थसंग्रहांतील इंडियन कारागिरीच्या वस्तु येथें एकत्र केल्या आहेत. या प्रदर्शनावरून हें स्पष्ट दिसेल कीं येथें देशी कारागिरीला परकीय राष्ट्रांचे नमुने नको आहेत आणि इंडियन नमुनेच इतके सुंदर व नामी आहेत कीं प्रस्तुतच्या कारागिरीत यांचें यथार्थ बिम्ब उठलें म्हणजे पुरें होणार आहे.

कारागिरीच्या उत्कृष्टपणापेक्षां व्यापारी गरजांनाच सध्यां वर्चस्व आहे; हस्तकौशल्याला वाफेच्या यंत्रांनीं अगदीं मागें टाकलें आहे आणि लोकांच्या आवडीपेक्षां त्यांच्या गरजेच्या पदार्थांसच पुष्कळ गिऱ्हाइकी मिळते. या तिन्ही गोष्टींनीं देशी कलाकौशल्याचा जो व्हास होत चालला आहे तो व्हास अनिवार्य आहे पण या दृष्टीनें या प्रदर्शनाचा उपयोगच नाहीं. यंत्रामुळें हस्तकौशल्य नाहींसेंच होईल हें निर्विवाद आहे. हाताचे रेचे व माग जाऊन तेथें यांत्रिक कारखाने आलेच पाहिजेत व हीच सर्व जगाची रहाटी आहे. हा काल असा आहे कीं लोक सुखाची पर्वा करितात व त्यांस जी वस्तु स्वस्त मिळेल तीच पाहिजे असते. आणि म्हणून वस्तूच्या सौंदर्याला कोणी फारसें मूल्य देत नाहीं. त्या शिवाय लोकांस हव्यास असा असतो कीं नवीन परराष्ट्रीय असेल तें अगोदर पाहिजे. लोकांच्या या बिघडलेल्या अभिरुची पुढें देशी कलाकौशल्य बुडणार

लोकांची जशी अभिरुची असेल व त्यांची जशी गरज असेल तसेच पदार्थ देशी कारागिरीनें उत्पन्न होतील तरच ती कारागिरी पुढ चालू राहते. आणि या विचाराच्या दृष्टीनें पाहतां देशी कारागिरी चांगली राखणें हें देशी संस्थानिक व लक्ष्मीवान लोक व कलाकौशल्याचे शोकी श्रीमान लोक यांच्या हाती आहे त्यांनीं आपआपल्या राजवाड्यांत बुसेलच्या भपकदार सतरंज्या, इटालीचीं तऱ्हेवाईक अस्तरणें, फ्रेंच चित्रें, टॉटेनहामच्या शोभाकारकाचजा, ऑस्ट्रियांचे भपकेदार सामान, व जर्मनींतील गालिचे इत्यादिकांची गर्दी करितां कामा नये. इंग्रजांतही असाच अनिष्ट प्रकार दृष्टीस पडतो परराष्ट्रीय वस्तूंची भूल दूर केली पाहिजे ज्या त्या देशांतल्या कारागिरीचे पदार्थ त्या देशांतच प्रथम खपले पाहिजेत. प्रस्तुतच्या विलायती मोहकपणाला न भुलतां राजेरजवाड्यांनीं व श्रीमंतांनीं आपल्या देशी व जन्य, पण उत्कृष्ट कारागिरीचें जर अभिनंदन केलें तरच या व्हास पावलेल्या कलाकौशल्याचा भाग्योदय काल येईल. या सत्कार्याला विलंब होईल तर पुढें कदाचित् कांहींच गोष्ट सिद्धीला जाणार नाहीं.

इतक्या ह्या गोष्टी प्रतिकूळ आहेत तर या प्रदर्शनाचा हेतु कोणता व यांचें प्रयोजन काय असा प्रश्न उत्पन्न होतो. याचें उत्तर थोडक्यांत आहे. हें प्रदर्शन म्हणजे कलाकौशल्याचे प्रत्यक्ष धडेच आहेत. इंडियांतील कारागिरांची कल्पनाशक्ति, त्यांची कुशलता व कारागिरी हीं कितपत विद्यमान आहेत हें या प्रदर्शना वरून दिसून येईल. इंडियांतील कारागिरांची शिल्पविद्या अजून नष्ट झालेली नाहीं; फक्त यांना उत्तेजन व आश्रय पाहिजे आहे. इंडियन राजवाडा शृंगारण्याला किंवा गृह सुशोभित करण्याला विलायती चीजवस्तूंची गरज नाहीं आणि इंडियन पदार्थांनींच राजवाड्यांस व गृहांस मोठी रमणीय शोभा येईल हें या प्रदर्शना पासून शिकावयाचें आहे. हे इंडियन पदार्थ कारागिरीच्या दृष्टीनें व उपयुक्ततेच्या दृष्टीनें चांगले तयार करण्या सारखे कारागिर अजून उपलब्ध आहेत प्राचीन काळापासून चालत आलेल्या या कला व हुन्नर हीं आम्हाला पूर्वजांकडून उत्कृष्ठ इस्टेट मिळाली आहे आणि ती आपणांपाशीं या कारागिरांनींच अजून कायम राखिली आहे. या प्रदर्शनाचा खरा उद्देश देशाभिमानाच्या गोष्टी उर्जित दशेला आणण्याचा आहे आणि तो लार्ड कर्झन साहेबांच्या इच्छे प्रमाणें शेवटाला जावो एवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

---

## संदेश.

( चक्रवर्ती बादशहा यांच्या हुकुमावरून लार्ड कर्झन यांनीं प्रविष्ट केलेला )

माझे इंडियन लोक माझ्या राज्यारोहणाचा महोत्सव करीत आहेत अशा समारंभाच्या प्रसंगीं त्यांच्याकडे अभिनंदनपर संदेश धाडण्याचा मला मोठा आनंद वाटतो.

लंडन शहरीं हा समारंभ झाला तेव्हां इंडियन संस्थानिक व लोकाग्रणी लोक यांच्यापैकीं फारच थोड्या जणांस येतां आले आणि म्हणूनच मी माझे प्रतिनिधी

कीं, दिल्लीला एक मोठा दरबार भरवावा म्हणजे इंडियन राजेरजवाडे, सरदार मंडळी आणि श्रेष्ट श्रेष्ट लोक व तसेच आमचे अधिकारी मंडळ यांस राज्यारोहणाची ही मंगलकारक गोष्ट चिरकाल ध्यानांत धरण्या सारखी होईल.

१८७५ सालीं इंडियांत मी येऊन गेलों तेव्हां पासून या देशा विषयीं मला मोठें महत्व वाटतें आणि माझ्या घराण्याविषयीं व गादीविषयीं या लोकांच्या अंतःकरणांत दृढ प्रेम व मोठा भक्तिभाव वास करितो हें मी पक्केपणीं ओळखून आहे. अगदीं अलिकडील कांहीं वर्षांतच यांच्या राजभक्तीची पक्की साक्षच पटली आणि माझ्या राज्यांत ज्या लढाया झाल्या व यशश्री मिळाली त्यामध्यें माझ्या इंडियन लष्करानें उत्कृष्ट बहादुरी केली आहे. मला पूर्ण आशा आहे कीं युवराज व युवराज्ञी हीं उभयतां लवकरच स्वतां इंडियाला जाऊन या देशाची ओळख करून घेणार आहेत. माझी मोठी इच्छा आहे कीं त्यांनीं हा देश अवश्य पाहावा आणि त्यांचाही मनोदय तसाच आहे.

या अशा संस्मरणीय प्रसंगीं मी समक्षच इंडियाला आनंदानें आलों असतो. परंतु तसें करण्याचा योग जुळण्या सारखा नव्हता तथापि मी माझे प्रियबंधु ड्यूक आफ कॅनाट यांस पाठविलें आहे. त्यांचा इंडियाशीं पूर्वींचाच परिचय चांगला आहे. माझ्या राज्याभिषेकाच्या मंगल कार्याच्या समयीं माझ्या घराण्याच्या तर्फेनें तेच हजर राहतील.

माझ्या परमपूज्य मातोश्री व्हिक्टोरिया, इंडियाच्या चक्रवर्ती महाराणी, या कैलासवासी होऊन यांच्या गादीवर मी बसलों तेव्हां पासून मी त्यांच्याच लोककल्याणकारी व न्यायी समदृष्टीच्या राज्यकारभाराच्या तत्वाला तंतोतंत धरून चाललों आहें. त्यांच्या त्या कारभारानें इंडियन लोकांच्या मनांत त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि व दृढप्रेम हीं सदा वागत असत. आणि तो किती तरी अपूर्व होता! इंडियांतील माझ्या सर्व मांडलिक राजांस व प्रजासमूहांस मी पुन्हां आश्वासन देतों कीं यां या स्वातंत्र्या विषयीं मी काळजी ठेवीन, त्यांचा मानपान व हक्क या विषयीं मी अभिमान बाळगीन, त्यांच्या कल्याणाविषयीं मी अहर्निश प्रयत्न करीन, व यांचें कल्याण संपादण्याविषयीं मी तत्पर राहीन.

याच गोष्टी माझ्या कारकिर्दीच्या मुख्य किल्ल्या होत व त्याच सिद्धीस नेण्याचा मी संकेत केला आहे. आणि ईश्वर कृपा करील तर या गोष्टींनींच माझ्या इंडियन राज्याची उत्तरोत्तर भरभराट होईल व त्या गोष्टी इंडियन लोकांच्या अधिकाधिक सुखाला कारणभूत होतील.

---

## दिल्ली दरबार

इंडियन इतिहासांत हा एक अपूर्वच समारंभ झाला. या दरबाराचीं वर्णनें वाचलीं म्हणजे असा भास होतो कीं सर्व जगाची शोभा या स्थळीं उतरली असावी. या दरबाराची योग्य कल्पना देण्याला बाणा सारखा कादंबरीकारच पाहिजे. निव्वळ कल्पना

निरसच वाटेल. या कल्पनेला चालक शक्ती देण्याला एखाद्या कवीचीच दृष्टी मिळाली पाहिजे. इंडियाला संपत्तीचें माहेरघर ह्मणत असत परंतु हा दरबार ह्मणजे खरोखरच लक्ष्मीचें विलास मंदिर बनलें होतें. दहा हजार लोक बसतील, एवढा रमणीय व भव्य असा चंद्रकोरी सभामंडप कल्पा, या मध्यें दोन सुवर्णमय सिंहासनें डोळ्यापुढें आणा, जिकडे तिकडे गालिचे, जरतारी कामाचीं अस्तरणें मांडा, एका वर एक अशा उंच उंच खुर्च्यांच्या रांगा अर्धवर्तुळाकृती लावा, व सर्व सभागृहांत राजेरजवाडे व श्रीमान लोक स्थानावर बसवा ह्मणजे चित्रविचित्र उंची उंची पोषाख, रत्नभूषणें, सोन्यारुप्याचे दागदागिने, नानाविध वाद्यांचा जयदुंदुभि, सभोंवार लष्करी पोषाखांत सजलेली ४० हजार लोकांची पलटण, हत्ती, घोडे, रथ इत्यादिकांची नौहर शोभा, तोफांची सलामी इत्यादि गोष्टींचें डोळ्या पुढें चित्र उभें करा ह्मणजे कांहीं थोडीशी कल्पना दरबारासंबंधानें येईल. सर्व जगाच्या लोकसंख्येची एक पंचमांश लोकसंख्या इंडिया च्या अफाट राज्यांत आहे. या इतक्या लोकांपैकीं निवडक निवडक श्रेष्ट लोक तेथें जमले होते, व जगांतील इतर राष्ट्रांच्या वतीनेंही कांहीं थोर थोर पुरुषही या समारंभाला मुद्दाम आले होते.

हा दरबार ह्मणजे एका प्रकारें जगांतील लोकांचें प्रदर्शन होतें. श्रीमंतीच्या व वैभवाच्या सर्व गोष्टि तेथें एकवटल्या होत्या आणि अशा दरबारांत ड्यूक आफ कॅनाट एका सिंहासनावर बसले असतांना दुसऱ्या सिंहासनीं लार्ड कर्झन विराजमान होते. यांनीं चक्रवर्ती बादशहाचा संदेश वाचून दाखविला.

नंतर राज्यारोहणा संबंधानें यांनीं सुंदरसें भाषण केलें. त्यांत त्यांनीं इंग्रजी राज्याची महती अशी सांगितली इंडिया सारखें राज्य संपादणें ही अप्रतिम बहादुरी होय, त्यासि, न्यायानें व प्रामाणिकपणानें तें राज्य चालविणें ही मोठ्या कर्तबगारीची गोष्ट होय. आणि धुरंधर मुत्सद्दीपणानें या राज्याचें एक राष्ट्र करणें ही गोष्ट तर सर्वोत्तम व अत्यंत श्रेष्ठपणाची होय. या गोष्टीच इंग्रजी राज्याच्या मुख्य किल्या आहेत. महाराज एडवर्ड सरकार यांची कारकीर्द दीर्घकाल चालो, सर्व सुखसंपदा व धनधान्य समृद्धि, व अष्ट ऋद्धिसिद्धी सदैव यांच्या राज्यांत नांदोत एवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

## अभिनंदन

दिल्ली दरबाराच्या प्रसंगानें पदव्या व किताब हे वाटण्यात आले. या वाटणींत आमच्या प्रांताच्या हिश्याला बराच भाग आला आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. अशा कृपा प्रसादाच्या दानामध्यें सर्वच योग्य व लायक गृहस्थाचा समावेश होत असतो असें नाहीं परंतु ज्याची निराशा होते त्यांना समाधान मानण्याला मोठें कारण हे दिसतें कीं केव्हां तरी आपली महती व लायकी सरकाराच्या निदर्शनास येईल आणि जेव्हां सरकार कृपा करील तेव्हां हा मार्गप्रतीक्षेचा काल सुखकर वाटेल व झालेल्या श्रमांचा परिहार उत्तम होईल. हें आशासुख प्रत्यक्ष सुखापेक्षां अधिक मौल्यवान असतें ह्मणुन तें आह्मी आमच्या निराश झालेल्या कित्येक होतकरू रावबहादुरांस व रावसाहेबांस प्रेमपूर्वक अर्पण करितों.

या पदवीदानामध्यें आमच्या प्रांताला मुख्य मानाची पदवी आली आहे ती 'कम्पानिअन आफ दी इंडियन एम्पायर' ही होय. आमच्या प्रांताचे 'आफिशिएटींग कमिशनर मि. अलेक्झांडर इलियट यांस हा किताब मिळाला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. आमच्या प्रांतांत हे चवथे सी. आ. इ. आहेत. पहिले सी. आय. इ. ह्मणजे मि० बहिमनजी जामासजी पेनशनर असि० कमिशनर हे होते. दुसरे सी. आय. इ. ह्मणजे कैलासवासी राव बहादूर श्रीराम भिकाजी जटार बी. ए. हे होते. यांच्या नांवाची आठवण मनाला किती तरी आनंदकारक वाटते! तिसरे गृहस्थ ह्मणजे मि० बुल्क साहेब कमिशनर हे होत हे सध्यां रजेवर आहेत. त्यांच्या रजेंत मि० इलियट यांनीं आपली कारकीर्द उत्तम ठेविली ह्मणून त्यांच्या बहुत कालाच्या चाकरीचें बक्षीस या जुन्या सरदारास पेनशनीच्या वेळीं मिळत आहे हें पाहून मोठा आनंद वाटतो.

'खान बहादूर' हा किताब मि० आरदेसर दिनसाजी चिनाय एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस देण्यांत आला आहे. ही गोष्ट मोठ्या आनंदाची कीं, त्यांनीं गेल्या सेन्सस मध्यें जी उत्कृष्ट कामगिरी बजाविली तिची वाहवा सरकारानीं चांगली केली आहे. खान साहेब हा पहिला किताब न देता एकदम मोठी खानबहादुरी मि. चिनॉय यांस मिळाली या बद्दल त्यांचें आह्मी अभिनंदन पुनःपुनः करितों.

'राव बहादूर' हा किताब यंदा टेलिग्राफ खात्यामध्यें एकाच नेटिवाला मिळाला आहे. हे गृहस्थ आमच्या वऱ्हाडांत सब्-असि. सुपरिंटेंडेंट होते. सध्यां ते मुंबईस बदलले आहेत तरी त्यांचें वास्तव्य आकोल्यास आहे. हे फार जुने चाकर असून वरिष्ठ खात्यांत मोठ्या हुद्द्यावर चढले आहेत. त्यांचा पेनशनीचा काळही जवळ आला आहे. अशांच्या उत्कृष्ठ चाकरीचें या किताबानें चीज होतें इतकेंच नाहीं तर सरकारी चाकरांनीं आपल्या नोकरींत कसा राम घटूं लागतो. आह्मी पंडित विष्णु सदाशिव बापट यांचें मोठ्या मनोभावानें अभिनंदन करितों आणि त्यांच्या मनाला या परितोषकानें अधिक उल्हास व आनंद होऊन त्यांस खानगी व सार्वजनिक सत्कार्यांची होस वाटो असें इच्छितों.

'राव साहेब' हें उपपद रा. रा. आनंदराव तुकाराम देशमुख जरूड तालुका मोर्शी यांस देण्यांत आलें. हे गृहस्थ लोकांच्या लोभांतले आहेत तसेंच ते सरकाराच्या आदरालाहि पात्र आहेत हें पाहून आनंद वाटतो. सार्वजनिक कार्यांत हे पुढें असतात आणि आपल्या गेल्या आफिसर मंडळीचा व इतर प्रतिष्ठित लोकांचा आदर सत्कार चांगल्या श्रीमंती थाटावर करीत असतात. त्यांचा हा बहुमान पाहून मोठा आनंद वाटतो, आणि वतनदार मंडळी पैकीं यांच्या सारख्यांस उत्तरोत्तर मोठमोठे मानपान मिळोत असें मनापासून आह्मी इच्छितों.

# The Berar Samachar

MONDAY JANUARY 5 1903

To the greatest delight of all, the Delhi Durbar was a grand success. The pageant is over but the Indian Coronation of His Majesty the king Emperor will be an event of unique interest in the history of India. The Durbar event is unprecedented in magnificence, grandeur and splendour. No history records such a fortuitous concourse of humanity which epitomizes what is best and noblest in one fifth of the whole human race in the world. The Coronation Durbar will go down to posterity as an immortal monument of the indissoluble loyalty of the Indian people and the parmanent stability of the English empire in India. The event is now a fact of the past and its earthly grandeur palls before the ever—lasting moral of this coronation—the greatest and the most solemn one that any nation has ever beheld. There is the supreme moral of this grandest function. Its excellence lies in the great good that awaits us in the near future. It heralds an era of a greater Indian empire with the greatest happiness of the Indian people. The moral is that here at the altar of the Delhi Durbar there is consecrated for ever the political relation between the Indians and their august rulers, by the best and the noblest of human motives, that make such a fairy nation, a great wonder of the world. The Durbar expands the view of an ideal empire. It magnifies the proportions of a great human achievement and places it on the goldy principles of welding one harmonious nation of the vast Indian Empire.

Out side Delhi, there were similar Durbars held at almost all District stations in the whole of the Empire. But the there the Royal proclamation fell flat in the nothingness of its information on the large audiences on 1st January 1903. Great disappointment prevailed and every one felt that His Majesty should be so unkind and uncharitable to his Indian people. But the news of the Delhi Durbar brought new life to the hopes and aspirations of the people. We came to realize that King Emperor Edward VII is our beloved soverign of a deep, emotional and kind heart. His Majesty's message came like an angel in hours of despair. And it breathed therein those noble sentiments of his august mother. The angry spirit of the nation became at once radiant with cheerful hopes and aspirations. We feel now in the inmost of our hearts a stirring pulsation of the new life that blooms upon us in the rule of His Majesty. God grant it and let every letter of the concluding portion of the royal message be true and faithful to the very spirit of it:—

"My desire, since I succeed to the throne of my revered mother, the late Queen Victoria, the Empress of India, has been to maintain unimpaired the same principles of human and equitable administration which secured for her, in so wonderful a degree, the veneration and affection of her Indian subjects. To all my feudatories and subjects throughout India, I renew the assurance of my regard for their dignities and rights, of interest in their advancement, and of devotion to their welfare which are the supreme aim and object of my rule, and which under the blessing of Almighty God, will lead to the increasing prosperity of my Indian Empire and the greater happiness of its people."

God Save the King Emperor.

## वऱ्हाडवृत्त

वारशीटाकळीकर एक मित्र कळवितात कीं तेथील काजी मि. फकरुद्दीन साहेब व सावकार रा. रा. किसनलाल मोहनलाल या उभयतांनीं पुढारपण घेऊन १ ले जानेवारीला, वस्त्रदान, अन्नदान, द्रव्यदान आतषबाजी, नाचरंग इत्यादि आनंदकारक गोष्टी पुष्कळशा केल्या.

उमरावतीचा मंडप जळून मोठें नुकसान झालें तरी दरबाराचा समारंभ फार चांगल्या रितीनें शेवटास गेला. अशा कांहीं गोष्टीपुढें माणसाचा इलाज काय!

राज्यारोहणाचा दरबारा संबंधानें पत्रव्यवहार पुष्कळच आले आहेत पण आमचा नाइलाज झाला आहे एकंदरीनें हें खरें कीं १ ल्या जानेवारी सारखा आनंदाचा दिवस तोच होय!

## आकोला जेल

कर्नल रेली साहेब बहादूर यांचे स्वतांचे कमांडाखालीं ता० १ जानेवारी १९०३ रोजीं सकाळीं ७ वाजतां जेलावरील सर्व शिपाई जेला पुढील मैदानांत एकत्र करून यांची परेड झाली. आणि राजाचे नांवानीं ब्युगल व बंदुकांची तीन वेळा सलामी देण्यांत आली.

"Union-Jack" युनियन जॅक निशाण उभें करून बादशहाच्या नांवानें तीन वेळ जयघोष करण्यांत आला.

७॥ वाजतां सर्व कैदी लोकांस राजाचा जाहिरनामा वाचून दाखविला व कोणकोणत्या कैद्यास किती किती माफी मिळाली हें प्रत्येकास सांगण्यांत आलें. व ८४ कैदी राज्यारोहणप्रित्यर्थ बंधमुक्त केले गेले.

जेल व सिव्हिल ऑस्पिटल मधील सर्व नोकर लोकांस मे० कर्नल रेली साहेब बहादूर यांचे तर्फे [illegible] देण्यांत आला. व कैदी सर्व लहान मोठ्यांस मिठाई वाटण्यांत आली. एकंदर मनुष्यांची संख्या १०० वर होती.

रात्रीं जेलर व वारडर लोक व सिव्हिल ऑस्पिटल मधील डाक्टर व कारकून वगैरे लोकांचे घरा समोर दिव्यांच्या रोषणाई करण्यांत आली.

हा सर्व खर्च मे० कर्नल रेली साहेब बहादूर यांनीं स्वतः केला. खरोखरी ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय व भूषणास्पद आहे, यांत शंका नाहीं.

## विज्ञापना

## (२ रुपयांत 'वऱ्हाडसमाचार')

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालू १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनांत योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदारांचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल या मानानें आह्मी वर्तमानपत्रांतही पुष्कळ सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो!

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार.

## Kadi हें काय आहे ?

दाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतराचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, वशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.



## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट



## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-




दखना चाहिय क्या मुल्क कदर करती हे ।
ढूंढते फिर्ते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रयेक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.



K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध २७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता— खोजानुरा इस्मायल आणि कंपनी. जी. बी. वर्धा. सी. पी.



## मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें तत्वेवाईक विषयांसह येत्या मासांत निघेल.

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० ह० सह आगाऊ १।.

पत्ता- के. डी. फोटो आर्टिस्ट वर्धा सी. पी.



## ॐ नम[illegible]शाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाचो खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाचो गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीहि घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ख० आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:—

३५ गों० १ रु०; ७५ गों० २ रु० ११५गों० ३ रु० १६५गों० ४ रु०; २७५गों० ६ रु० ५५०गों० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व साधनाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे दोन तीन वर्षें आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.


## POSTAL NOTICE

*DELHI CORONATION DURBAR*

In order to facilitate the early delivery of postal articles intended for persons residing in any of the camps at Delhi during the Coronation Durbar, the public are requested to specify clearly in the address the name of the particular camp in which the addressee is residing and to add the words "Delhi Coronation Durbar" or "Delhi Durbar" as the *last* words of the address. It is particularly requested that the name of the post town "Delhi" may not be added as the last word of the address, as articles intended for the camp which are so addressed will in the first instance have to be sent to the permanent post-office at Delhi and will consequently be delayed.

H. M. Kisch,

Calcutta, 27/11/1902 } *Offg. Director-General of the Post Office of India*

## पोष्टाची जाहिरात.

दिल्ली येथील राज्यारोहण निमित्त भरणाऱ्या दरबारांत जे जे लोक जातील यांचीं पत्रें वगैरे लवकर व बिनचूक त्यांस मिळावीं ह्मणून सर्व लोकांस खालील सूचना करण्यांत येत आहे.

पत्रावर पत्ता लिहिते वेळीं ज्यास ते मिळावयाचे असेल ते गृहस्थ ज्या कंपांपाऱ्हेंत असतील त्याचें नांव किंवा नंबर चांगलें सुवाच्य अक्षरांत लिहून शेवटीं गांवाचें नांव "दिल्ली कॉरोनेशन दरबार" (Delhi Coronation Darbar) किंवा "दिल्ली दरबार (Delhi Darbar) असें असावें. कारण नुसतें दिल्ली असें लिहिल्यानें पत्रें तेथील मुख्य टपालांत पाठविलीं जाऊन तकासिमीस विलंब होईल. उदाहरण:—

रा. रा. रायोबा रतीराम,
क्यांप नंबर १०
दिल्ली दरबार.

का० ज० लालकाका.
डिपुटी पोस्ट मास्तर जनरल,
मध्यप्रांत आणि वऱ्हाड.

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास............................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८०१
दर ओळीस........८१०६
दुबार खेपेस.... ........८१

REGISTERED N. No.

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 12 JANUARY 1903 NO 2

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १२ माहे जानेवारी सन १९०३ इ० अंक २

### विज्ञापना

### (२ रुपयांत 'वऱ्हाडसमाचार')

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनात योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदाराचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल ह्या मानानें आह्मी वर्तमानपत्रांतही पुष्कळ सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

---

दिवाणी दावा नंबर १० सन १९०२ क्लास २१

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सर्टिफिकीट देण्याचा कायदा अक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हिल जड्ज आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार हरी विठ्ठल व रघुनाथ विठ्ठल उभयता अज्ञान पालन करणार मातोश्री रुक्षमाबाई नवरे विठ्ठलपंत.

सर्वत्रास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें मयत विठ्ठल रंगो तारे वकील आकोले याने ओरिंयेंटल लाईफ गव्हरमेंट सिक्युरिटी लाईफ आश्युअरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीमध्यें आपल्या आयुष्याचा विमा उतरला आहे त्या विम्याच्या पॉलिसीचा नंबर ३२२९७ आहे ह्या विम्याचे सरासरी रुपये २८०० मिळण्याबद्दल अर्ज. हें वसूल करण्याकरितां सर्टिफिकीट मिळावें ह्मणून तारीख १७ माहे दिसेंबर सन १९०२ इसवी रोजी अर्ज केला आहे व ह्या अर्जाची चौकशीची तारीख २४ माहे जानेवारी सन १९०३ इसवी रोजी मुकर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तैवज वगैरे सुद्धा आमचे कोर्टांत अर्जदार यानला कां सर्टिफिकीट देऊं नये याच कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्या निशी ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २३ माहे १२ सन १९०२ इसवी.

V. N. Dandeker,
Civil Judge.
Akola

---

### POSTAL NOTICE

*DELHI CORONATION DURBAR*

In order to facilitate the early delivery of postal articles intended for persons residing in any of the camps at Delhi during the Coronation Durbar, the public are requested to specify clearly in the address the name of the particular camp in which the addressee is residing and to add the words "Delhi Coronation Durbar" or "Delhi Durbar" as the *last* words of the address. It is particularly requested that the name of the post-town "Delhi" may not be added as the last word of the address, as articles intended for the camp which are so addressed will in the first instance have to be sent to the permanent post-office at Delhi and will consequently be delayed.

H. M. Kisch,

Calcutta, 27/11/1902 } *Offg. Director-General of the Post Office of India*

### पोष्टाची जाहिरात.

दिल्ली येथील राज्यारोहण निमित्त भरणाऱ्या दरबारांत जे जे लोक जातील त्यांचीं पत्रें वगैरे लवकर व बिनचूक त्यांस मिळावीं ह्मणून सर्व लोकांस खालील सूचना करण्यांत येत आहे.

पत्रावर पत्ता लिहिते वेळीं ज्यास तें मिळावयाचे असेल ते गृहस्थ ज्या क्यांपा मध्यें असतील त्यांचें नांव किंवा नंबर चांगलें सुवाच्य असून शेवटीं गांवाचें नांव दिल्ली कॉरोनेशन दरबार" (Delhi Coronation Darbar) किंवा "दिल्ली दरबार (Delhi Darbar) असें असावें. कारण नुसतें दिल्ली असें लिहिल्यानें पत्रें तेथील मुख्य टपालांत पाठविलीं जाऊन तकासिमीस विलंब होईल. उदाहरण:—

रा. रा. राघोबा रतीराम,
क्यांप नंबर १०
दिल्ली दरबार.

का० ज० लालकाका
डिपुटी पोस्ट मास्तर जनरल,
मध्यप्रांत आणि वऱ्हाड

---

### सुद्दाम वैश्य लोकांच्या हिता संबंधीं

#### लेख ३

[ ४६ अंकावरून पुढें चालूं ]

मागील लेखांत सुचविल्या प्रमाणें आमच्या जातींत शिक्षणाची किती मोठी कळलेंच असेल. परंतु आमच्यांत जी एक प्राण घातुक दुष्ट चाल आहे ती अगोदर बंद झाल्या शिवाय शिक्षणाचा फैलाव होणें अगदींच असंभवनीय आहे. ती चाल बाल पणीं लग्न करणें होय. तरी आज बालविवाहा संबंधानेंच दोन शब्द लिहितों. बालविवाह हें शास्त्र विरुद्ध आहे. व शास्त्रविरुद्ध लोकांनींच हा प्रघात सुरू केला असावा असें वाटतें. या विषया संबंधानें एक लहानशी गोष्ट विचार करण्या सारखी आहे कीं वैश्य जातींनीं यज्ञोपवीत संस्कार १२ वर्षींचें वय झाल्यावर करावें व त्यानंतर विद्याध्ययन करावें. असें शास्त्रात घटलें आहे, कीं, याला कमींत कमी ८ आठ वर्षांची मुदत पाहिजे, तर या हिशेबानें २० विसाव्या वर्षीं लग्न झालें पाहिजे. कारण लग्न झाल्यावर विद्याध्ययन व असेंच दुसरें काम होऊं शकत नाहीं. या करितां कमींत कमी १६।१८ वर्षांचें वय होई पर्यंत तरी लग्न करूं नये. बहुश: मुलीचा बाप पैसेवाल्याचा मुलगा शोधतो. परंतु हीच मोठी भारी चूकी आहे. कारण वास्तविक पाहतां मुलगा चांगला आहे किंवा नाहीं हेंच पाहिलें पाहिजे. व १६।१८ वर्षांचें वय होई पर्यंत त्याचा चंगूलवाईटपणा लक्षांत येऊंच शकत नाहीं. याच करितां विवाहाची वेळा ह्या वर्षां नंतरच ठेविली पाहिजे. कोणी कोणी असें समजतात कीं, जर आपल्या मुलीचें लग्न लहान वयांत होऊन जाईल तर ती मोठ्या घराण्यांत जाईल. परंतु ही गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्या जातींत विधवा विवाह होत नाहींत त्यांत १२ वर्षांचें वय असतांना अगर त्याच्याही अगोदर लग्न करून देणें ह्मणजे तिला वैधव्याच्या घोर दु:खांत ढकलून देणें होय. कारण ही गोष्ट सर्वांस माहितच आहे कीं, लहान वयांत जितकीं अधिक मुलें मरतात तितकीं मोठीं झाल्यावर मरत नाहींत असें एखाद्या आंब्याच्या वृक्षा पासून मोहोर जितका अधिक झडून पडतो तितक्या प्रमाणावर लहान लहान कैऱ्या पडत नाहींत. व जसजशा कैऱ्या मोठमोठ्या होत जात तसतशा कमी पडतात. तशीच दशा मनुष्याची आहे. १८ अठरा वर्षां नंतर मनुष्य पूर्णावस्थेंत येतो. या करितां याच्याहून लहान वयांत लग्न करितां कामा नये. लग्नसंस्कार हा स्त्री पुरुषांच्या धर्मपालनार्थ आहे. परंतु जेव्हा त्यांना धर्म ह्मणजे काय व लग्न ह्मणजे काय हेंच कळत नाहीं तेव्हां त्या वेळेस लग्न संस्कार करण्याची कोणती आवश्यकता आहे? आपल्याला माहितच असेल कीं, सुमारें ५०।६० पन्नास साठ वर्षांपूर्वीं चचक (धातुक्षीणतेचा) रोग इतका होत नव्हता. पण तो आज काल होतो याचें कारण हेंच आहे कीं, त्यावेळेस इतक्या वर्षांच्या वयाच्या पूर्वीं ह्या रोगाचा प्रभाव मनुष्यावर लागू होतो. यामुळें या वयाच्या पूर्वीं जो संतती होते त्यांना हा रोग जास्त त्रास देतो. पूर्वीं ८ वर्षांच्या मुलींचीं लग्नें होत नव्हतीं. निदान रामायण, महाभारत, व ब्रह्मपुराणांतही १६।१८ वर्षांच्या वयांत लग्नें करावीत असें लिहिलें आहे. सीता व द्रौपदी यांचीं वयें स्वयंवराच्या वेळेस १६ वर्षांचीं होतीं. ८।१० वर्षांचीं होतीं असें कोठेंही लिहिलेलें आढळत नाहीं. मुलीचें वय लग्नाचें वेळेस कमींत कमी १२ बारा वर्षांचें व मुलाचें सोळा वर्षांचें असलें पाहिजे. विवाह शब्द "वह्" धातू पासून झाला आहे व त्याचा अर्थ मी जन्मभर तुझें पोषण करीन" असा आहे. यावरून आपणांस कळेल कीं विवाह करणें ह्मणजे किती जोखमदारी शिरावर उचलणें आहे. व याच धातूपासून "वरवाह" शब्द झाला आहे. अर्थात खरोखर पाहिलें असतां विवाहाला आपण वरवाह करून दिलें आहे. विवाह शब्दाचा अर्थ असा आहे कीं, सर्व भार मी माझ्यावर घेतला. याच करितां विवाहाच्या वेळेस जो मंत्र उच्चारला जातो त्याचा अर्थ असा आहे कीं, मी तुझा भार माझ्या माथीं घेतो. परंतु हें पहा कीं, लग्नाच्या वेळेस मुलगा आपल्या स्वत:चाच बोझ जर उचलूं शकत नाहीं तर तो दुसऱ्याचें काय उचलूं शकणार आहे ! ज्या वेळेस मुलगा आपल्या स्वत:चा बोज उचलूं शकत नाहीं अशा वेळेस त्याच्या शिरीं संसाराचा बोझ टाकणें कोणतें शहाणपणाचें काम आहे ! बंगाल्यांत स्त्रियांना संसार, व आपल्यांत कुटुम्ब किंवा घर असें ह्मणतात. यावरून कळून येईल कीं स्त्री ही संसाराचें मूळ आहे. व ज्या अर्थीं स्त्रीला संसार, कुटुम्ब, घर ह्मणतात त्याअर्थीं लग्न केल्यानें एका दोघा माणसाचेंच नव्हे तर संसाराचा, कुटुंबाचा, सव घराचा बोझ मुलावर टाकणें होय. एक लहान मूल इतकी जोखमदारी कशी बरें उचलूं शकेल ? त्याच्या माथीं जबाबदारी टाकिली इतकेंच नव्हे परंतु आपण त्याला लबाडही बनविलें. कारण मंत्रांना अनुसरून त्यालाही प्रतिज्ञा करणें भाग आहे कीं, मी तुझें पालन पोषण करीन. परंतु जोंपर्यंत मुलगा अज्ञान आहे तोंपर्यंत त्याची प्रतिज्ञा खोटी आहे. याचा अर्थ असा झाला कीं, आपण त्याला फसवून राहिलों आहोत. कारण जी गोष्ट त्यावेळेस करणें त्याला असंभवनीय आहे त्याबद्दल त्यापासून प्रतिज्ञा करवून घेतो. यावरून कळून आलेंच असेल कीं, बालविवाह हा शास्त्र, लोक व युक्ती ह्या तिन्हींच्या विरुद्ध आहे. कोणी कोणी असें ह्मणतात कीं, लहानपणीं लग्न केल्यानें सोयऱ्याच्या येथून पुष्कळ मौल्यवान वस्तु येतात. परंतु जर

कळून येईल कीं, पुष्कळ अनावश्यक चिंता पडून पडून सडून जातात. आपणाला पैशाच्या ठिकाणीं रुपया अवश्य खर्च करावा लागतो. बुद्धीचा संबंध मेंदूशीं आहे व बालविवाहामुळें मेंदू निर्बळ होऊन जातो व नर शरीर प्रकृतीच चांगली राहणार नाहीं तर बुद्धी तीक्ष्ण कशी होणार! हीच दशा सौंदर्याची आहे. आरोग्य नसल्या कारणानें सौंदर्यही राहत नाहीं. खरोखर बालविवाह ही एक आमच्या जातींत अती दुष्ट प्राणघातुक चाल आहे. या मुळें शारीरिक बळ क्षीण होतें. मानसिक उन्नति होत नाहीं, परदेश गमन व पुरुषार्थाचीं कामें होत नाहींत. अनुचित व विजोड लग्नें होतात त्या मुळें अकालीं संतती होऊन मनुष्यें दीन, हीन व क्षीण होऊन जातात. वयांत येण्यापूर्वीच कुटुंबपोषणाची काळजी पाठीस लागून जाते. विद्याध्ययन होतच नाहीं व स्त्रियांना वैधव्यांत दिवस कंठावे लागतात आतां आपणच न्याय करा कीं, ज्या गोष्टीमुळें धर्म, धन, बुद्धी, बळ, व सौंदर्य ह्या गोष्टींचा नाश होतो ती गोष्ट करण्यापासून काय बरें फायदा आहे ? तरी आपल्या मुलांचें कल्याण व्हावें असें ज्या ज्या आईबापांना वाटत असेल (व सर्वांना वाटत असलेंच पाहिजे) ते आपआपल्या मुलांचीं लग्नें बालवयांत करण्याची चाल अजिबात सोडून देतील अशी आशा आहे.

खामगांव. } आपला
ता. १।१।०३ } एक मारवाडी (वैश्य)

---

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध १४ शके १८२४

## सलामती

वऱ्हाड प्रांताची राजकीय व्यवस्था नवी झाली आणि त्यामुळें वऱ्हाड प्रांताशीं निजाम सरकारचा कांहीं अर्थी अर्थी संबंध राहिला नाहीं असा सर्वसाधारण समज झाला आहे. या समजामुळें आमच्या मुसलमानी मंडळींत एक चमत्कारिक वाद पडला आहे. तो वाद असा कीं मुसलमानामध्यें दर आठवड्याला शुक्रवार हा दिवस सार्वजनिक प्रार्थनेचा असतो. शुक्रवाराला ते जुम्याचा दिवस ह्मणतात. या दिवशीं दोन प्रहरीं एक वाजतां खुद्‌बा पढतात. खुद्‌बा ह्मणजे अल्लाला अर्जी करणें होय. या निमाजाच्या वेळेला असा परिपाठ असतो कीं जेथें इस्लामी धर्माचा राजा असतो तेथें त्या राजाच्या नांवानें पैगंबरा पाशीं सलामती मागावी. या प्रघाता प्रमाणें आमच्या प्रांतांत जुम्याच्या दिवशीं मीर महिबूब निजाम सरकार यांच्या नांवानें सलामती पढत असतात. सलामती ह्मणजे दुवा. आतां निजाम सरकाराच्या नांवानें सलामती मागावी किंवा मागूं नये अशा विषयीं आमच्या मुसलमानबंधु मध्यें मतभेद पडला आहे. वऱ्हाड प्रांत खालसा करण्यांत आला आहे त्या अर्थी निजाम सरकारा संबंधानें दुवा मागण्याची गरज राहिली नाहीं असा पुष्कळ मुसलमानांचा अभिप्राय आहे. आमच्या मतानें हा अभिप्राय चुकीचा आहे. हा प्रांत अगोदर खालसा झालेला नाहीं. हा कौलपट्ट्यानें ब्रिटिश सरकाराकडे राहील ह्मणजे निव्वळ शाब्दिक राजेपणा निजाम सरकाराचाच आहे, इतकेंच नाहीं तर त्यांच्या गादीचा मान राखावा ह्मणून दरसाल त्यांच्या वाढ दिवशीं या प्रांतांत तोफांची सलामीही होणार आहे व त्यांचा बाहुटा एक दिवस फडकत रहावयाचा आहे. या प्रांतावर कर्तुम् अकर्तुम् शक्ती निजाम सरकाराची नाहीं, व ते नांवाचे मालक आहेत हेंही खरें; तथापि कायद्याच्या दृष्टीनें निजाम सरकाराची मालकी कायमच आहे. या मालकीच्या न्यायानें या प्रांताचा धनी इस्लामी धर्माचाच बहाल आहे. अर्थात् आमच्या मुसलमानभाईंनीं सलामती पूर्वीं प्रमाणें चालूं ठेविलीच पाहिजे. वरील गोष्टीला दुसरेंही एक समर्थन देण्यासारखें आहे. खुद्द निजाम सरकारांची इच्छाही अशीच दिसते कीं, दर जुम्याला मशिदींतून त्यांच्या सलामतीचा उच्चार होत असावा. त्यांचा हेतु या पेक्षांहि अधीक होता. ते इंग्रज सरकारापाशीं मागत होते कीं, त्यांच्या वाढदिवसा प्रमाणें इद्‌उल-फितर व इद्-उस-झोहा या दोन्ही दिवशीं तोफांची सलामी होत जावी व मशिदींतून खुद्‌बा पढण्यांत यावा, या हेतूला अनुकूल असा सरकारचा अभिप्राय पडला नाहीं. तथापि आमची मुसलमान मंडळी निजाम सरकारची सलामती अवश्यमेव चालू ठेवितील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

---

## तुफान दर्या

आज कालच्या स्थिति परिस्थिती वरून एका विलक्षण गोष्टीची आह्मांस आठवण होत आहे. ती गोष्ट कांहीं नवी आहे असें नाहीं; ती पुष्कळांना चांगली माहित असेल. पण ती गोष्ट जो आपला गर्भित अर्थ ध्वनित करिते तो फार खोल, दूर दृष्टीचा, व चांगला ध्यानांत वागविण्या सारखा आहे त्या गोष्टीचा प्रत्यक्ष प्रचीति आज आपणांस पाहावयास मिळत आहे. ती गोष्ट आपणांस जरूर ऐकिली पाहिजे कारण ती प्रस्तकालास अगदीं बरोबर लागूं पडत आहे. आणि ह्मणून ती गोष्ट आज येथें सांगितल्या खेरीज आमच्यानें राहवत नाहींत. ती

### चमत्कारिक गोष्ट

अशी— एके प्रसंगीं एक महान् तत्ववेत्ता नौकेंत बसून परतीरास जात होता. नावेंत दुसरे कोणीच उतारू नसल्यामुळें त्या नावाड्याचा व तत्ववेत्त्याचा खालील प्रमाणें संवाद झाला.

तत्ववेत्ता— नावाडी बोवा, आपणांस खगोलशास्त्र येतें काय?

नावाडी— महाराज, आपण काय ह्मणतां हें मला कांहींच समजत नाहीं.

त०- तर मग तुझें पाव आयुष्य व्यर्थ गेलें (पुन्हा कांहीं वेळानें)

त०- अरे, तुला भूगोलाची तरी कांहीं माहिती आहे कां?

नावाड्यानें पुन्हां पूर्ववत कांहीं माहिती नाहीं ह्मणून सांगितलें. ह्मणून तत्ववेत्ता— अरे तुझें आणखी पाव आयुष्य फुकट गेलें.

पुन्हां त०— बरें असो, तू भूमिती तरी जाणतोस काय?

ना० कांहीं नाहीं. उगीच कशाला विचारतां महाराज.

त०- झालें तुझें आणखी पाव आयुष्य व्यर्थ झालें.

पुढें कांहीं वेळानें मोठा सोसाट्याचा वारा सुटला, समुद्र फार खवळला व नौका सुरक्षित पोहोंचेल असा भरंवसा वाटेना तेव्हां

नावाडी- महाराज, आतां कठीण प्रसंग आला आहे. ह्मणून आपणांस विचारतो कीं, आपणास पोहतां येते काय?

त० - काय, आतां प्रसंग कठीण आहे ह्मणतोस, अरे पण मला तर पोहतां येत नाहीं; मग कसें?

ना० - महाराज, मला आपलीं शास्त्रं अवगत नसल्यामुळें माझें पाऊणच आयुष्य व्यर्थ झालें होतें, पण आतां तुह्मांस पोहतां येत नसल्यामुळें तुमचें सर्वच आयुष्य व्यर्थ झालें. तुह्मी आतां बुडून मरणार हा पहा मी चाललों पोहत. असें ह्मणून तो पोहून गेला व इकडे समुद्रांत नाव फुटून त्या तत्ववेत्याची काय वाट झाली असेल हें निराळें सांगणें नकोच.

झाली. गोष्ट संपली. ही गोष्ट आपल्यास काय सांगत आहे व कोणचा धडा शिकवीत आहे बरें? ही गोष्ट ऐकून आपल्या मनांत काय कल्पना उभ्या राहतात ! आपली छाती धडधड करूं लागते, आपलें चित्त अस्वस्थ होतें व आपल्या मनाची कासाविसी वाढते. प्रस्त प्रसंगीं आपण कोठें आहोंत. आपण कोणचा मार्ग धरिला आहे व आपण कोठें जाऊं याचा विचार आपण केलेला आहे काय ? आपली आज काय स्थिती आहे व पुढील कालावर नजर देऊन आपणांस कोणची तयारी केली पाहिजे हें आपणास केव्हां समजणार ! गोष्टींतील नावाड्यानें ह्मटल्या प्रमाणें आपलाहि नावाडी आपणांस ह्मणत आहे कीं— आपली राष्ट्रनौका धारेवर लागून फुटण्याच्या बेतांत आली आहे. व आपण ह्या प्रसंगीं अफाट समुद्रात दंड ठोकून उड्या घेतल्या शिवाय आपला मागमूसहि लागणार नाहीं हें पक्केपणीं समजा. ही एकच गोष्ट तुह्मी उमजणार नाहीं तर तुमचेंहि आयुष्य-सर्व-आयुष्य-व्यर्थ जाणार आहे.

---

## स्वागतम्

मे० ए. इलियट कमिशनर साहेब हे गेल्या शुक्रवारीं दिल्ली दरबाराहून परत वऱ्हाडांत आले, आणि अशांतच त्यांस सी. आय. इ. या बहुमानाच्या किताबाचा लाभ झाला आहे. तेव्हां त्यांचा सन्मान व स्वागत करण्याचें उमरावतीकरांनीं प्रथम साधलें हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो उमरावतीच्या स्टेशनावर उतरतांच त्यांस तेथील मुनसिपालिट्यांनीं मानपत्रें दिलीं आणि आपण जुने सरदार आहां, आपली कारकीर्द एक पिढीभर लांबली असून ती सर्वोत्कृष्ठ आहे असें सरकारी सी. आय. इ. किताबानेंही ठरलें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे, आपल्याला दीर्घ आयु व संपदा लाभून या प्रांताशीं आपला संबंध फार काळ राहो इत्यादि गोष्टी मानपत्रांत असावयाच्या तशा होत्या. आमच्या उमरावतीच्या मंडळीस कार्यभाराचा उरक मोठा आहे आणि त्यांनींच प्रथम स्वागत केलें व इतर जिल्ह्यांला नमुना घालून दिला याबद्दल इतर जिल्ह्यांतून उमरावतीकरांसही एक मानपत्र पाठविणें रास्त होईल. मे. इलियट साहेबांसही वाटलें असेल कीं, दिल्लीच्या थोर थोर दरबारी मंडळीमध्यें कः पदार्थ असण्यापेक्षां वऱ्हाडच्या राजधानीला कमिशनरीचें स्वागत घेण्याचा प्रकार विशेष संतोषपद होय. उमरावतीच्या स्वागताची तत्परता विलक्षण खरी ! ही तत्परता इतर गोष्टींत दिसून येईल तर किती बरें नामी होईल !

---

## निःसीम प्रेमा

मुख्य दिल्ली दरबारास ज्यांस जातां आलें नाहीं त्यांच्या साठीं मुद्दाम होऊन कृपाळू सरकारनीं गांवोगांवीं, शहरोंशहरीं व प्रांतोप्रांतीं लहान लहान दिल्ली दरबारची टूम उठवून देण्याची व्यवस्था केली होती व त्या व्यवस्थे प्रमाणें सर्व हिंदुस्थानभर दरबार, नाचरंग, गाणें, नाटकें, आतषबाजी गरिबांस अन्नदान, वस्त्रदान, व मेवामिठाई, दारूकाम, चिरागणें आदिकरून मंगलकारक आनंदाच्या गोष्टी, शहराच्या मानानें, लहान मोठ्या प्रमाणावर चांगल्या झाल्या. आमच्या कडे ह्या आनंदाच्या गोष्टी सुप्रसिद्ध करण्याबद्दल इतके पत्रव्यवहार येऊन पडले आहेत कीं, त्या सर्वांस आमच्या लहानशा पत्रांत जागा मिळणें अशक्य झालें आहे. एका दोघांचा नामनिर्देशानें उल्लेख करावा व बाकीच्यांस वगळावें या पेक्षां सर्वत्र राज्यारोहणानिमित्त आनंदोत्सव उत्कृष्ट घडले आणि ते प्रत्येकानें अहमहमिकेनें शक्तीच्या बाहेर केले आहेत असेंच सरसकट सांगणें जरूर आहे. असाच सरसकट उल्लेखाचा प्रसंग, नुकताच विलायतस समारंभ झाला तेव्हां आपल्या इकडेही लोकांनीं आनंद केला त्या वेळींहि आला होता. असें सरसकट सोळा टक्के करण्याच्या आमच्या विचाराला कित्येक दोष देतील. पण एकास खुष करण्या साठीं दुसऱ्याचें मन दुखवावें हें बरें नाहीं. ही आमची अडचण सर्वांस मान्य होईल व ते आह्मांस याबद्दल माफी करितील. इतकें ह्या प्रसंगीं सांगणें जरूर आहे; कीं दूरच्या विलायतेस राज्य करणाऱ्या राजावर लोकांची निष्ठा व प्रेम अप्रतीम आहे यांत शंका नाहीं. ही प्रजेची दृढ प्रीति आह्मी आमच्या राजाच्या चरणाप्रत अर्पण करितो.

# The Berar Samachar

MONDAY JANUARY 12 1903

The Delhi Durbar is now a matter of history. The pageant is only present in a living memory. Its grandeur wears away before the palsy hand of time. The stir of the Durbar has subsided and the din of the exhibitions, Durbars and Stately processions has also come to a stand-still. We are now gone over the triumphs and rejoicings of January 1st. The National Congress at Ahmedabad, the Theosophical Convention at Benaras, and the Mohomedan Conference at Delhi have had their moments of attraction and instruction. But at the top of all came off the Delhi Durbar and it was a function unsurpassed in riches, splendour and seriousness. People have now time to think rather seriously of this Durbar. In their thoughtful mood, they look to the Durbar from a sentimental stand-point. There are opinions and opinions and leading men of hight have expressed different views on this matter. It is very difficult to reconcile the conflicting views and we sit to moralize on the Delhi Durbar in the light of the diverse opinions. Before we do so, we wish to point to the bold spirit as well as great moral courage with which some of our Indian contemporaries have spoken their minds in characteristic frankness. The Marhatha of Poona has done a signal service in this respect. The Bengalee of Calcutta quotes the learned article of that paper with peculiar approbation. Many of our contemporaries declare that the Delhi Darbar is a grand failure. As a pageant it was a grand thing but as a function of national importance it fails altogether to win the sentiments of the nation. We are glad to find that some of the Anglo Indian newspapers are also amongst the ranks of detractors. The Pioneer, and the Bombay Gazette lend support to the views that Lord Curzen's Delhi Durbar does not come to the ideal wherein the whole nation will rejoice to find a new starting point for further progress of the nation.

"If the gorgeous ceremony in the city of the Mogul Emperors is open to criticism at all it is because it is constitutionally in the air—a spledid superfluity, but a superfluity still. Gaze and admire as we may, we cannot avoid being conscious that all that was necessary was done when the King was proclaimed district by district on his accession. His Majesty might have gone on reigning for another twenty years instead of two and the absence of a Delhi Durbar would have made no difference. One cannot, therefore, help the feeling that an observance which is no relation to constitutional facts has a certain deficiency, for however successful while it is merely arbitrary its future is uncertain." *Pioneer.*

We for ourselves wish to make a distinction in the bulk of criticism that was being levelled against the Durbar.

At first we think that we need not mix the question of discussing the advisability or otherwise of the Delhi Durbar. The Indian opinion was against holding such a Durbar on the ground of expendiure as well as its uselessness. But Lord Curzen held otherwise. His Excellency's wish was supreme and we were then bent upon seeing that the Durbar was the grand & unique success. Every thing went off very well; and we request our rulers to note the spirit of noble sacrifice and the mood of rejoining with which the whole Empire acclaimed with applause the solemnity of the Coronation of His Mojesty the King Emperor. We hope that the English people will see herein the devotion of the Indian people to the throne and to their firm belief that their future is indisolubly bound together with the future of the British Empire. The whole of the vast population came to the front and they did their best to celebrate the Indian Coronation in the most gorgeous and oriential style. It is as well to remember that such a universal rejoinings cost millions of Rupees to the poor people of India. The educative influence of these universal rejoinings inIndia was very great and permanent. But when we look to question how far the King Emperor has done his duty towards the people on such a solemu occasion we have to draw on sentiments to find for our highest ideals some hopeful expressions in the royal message. Nothing in a tangible form has come to the lot of the people. There is a profound despair in that respect and it is here that we perceive the failure of the Delhi Durbar. We hope that our gracious sovereign will soon give some perceptible significance to the noble expressions in his memorable message to the people. We shall then learn to read in the lines of the message some Magna—Charta of our future welfare. Let us see how Lord Curzon will meet us in this connection.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— कित्येक ठिकाणीं गारांची वृष्टी झाली. आभाळ वारंवार येते. हवा चांगली नाहीं तरी पण वाईटही नाहीं.

खामगांवास प्लेगाचा आजार कमी होत असून शेगांवासही कमी होण्याचा रंग दिसत आहे.

मे. हेअर साहेब हे हैदराबादेला आपल्या तपासणीच्या व अपिलाच्या कामासाठीं जात आहेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥≈ |
| सोनें | २४॥ |
| चांदी | ६१ |
| जवस | ११५ |
| जवारी | ६४ |
| गहू | १००—१२० |
| बाजरी | ६९ |
| मीठ | ४८— रु. मण |
| चणे | ३॥ रु. मण |
| तूप | ८ रु. मण |
| तेल | ६८= रु. मण |
| रुई | ५४— ६० |
| सर्की सट्टा | ५॥ ते ५॥≈ |
| जवारी सट्टा | ४४ |
| वोजा सट्टा | ५१ |
| कपाशी | ३६॥ — ३८॥ |


## NOTICE

The following Government currency notes having been stolen from our BEAWAR Agency the public are cautioned against negotiating such notes:

150 notes of Rs. 100 each

Nos. CA/63 86751 to 86900 — Rs. 15000

30 notes of Rs. 500 each

Nos. CA/65 20662 to 20691 — Rs. 15000

180 notes — Rs. 30000

All notes Bombay circle.

Any person who may come across any of the above mentioned notes is kindly requested to immediately communicate with us and the Superintendent of Police who has already been informed of the matter.

*Akola*
10/1/03

FOR RALLI BROTHERS AGENCY
*A. N. ELIOPULO*
Agent.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, खालीं लिहिलेल्या सरकारी करन्सी नोटा आमच्या बीवार एजन्तीच्या आफिसांतून चोरीस गेल्या आहेत; तर त्या नोटांची देवघेव कोणीहि करूं नये.

| नोटा | नंबर | एकूण रकम |
|---|---|---|
| प्रत्येक १०० रु. प्रमाणें १५० नोटा | CA/६३ ८६,७५१ पासून ते ८६,९०० | १५,००० |
| प्रत्येक ५०० रु. प्रमाणें ३० नोटा. | CA/६५ २०,६६२ पासून ते २०,६९१ | १५,००० |
| २४० एकूण नोटा | एकूण रुपये | ३०,००० |

ह्या सर्व नोटा मुंबईच्या आहेत.

कोणत्याही इसमास वरील नंबरची एखादी नोट मिळाल्यास त्यानें पोलीस सुपरिंटेन्डेंट यांस व आह्मांस तावडतोब खबर देण्याची मेहेरबानी करावी. या बाबतींत पोलिस सुपरिंटेंडेंट यांस आमचेकडून पूर्वींच कळविण्यांत आलें आहे. कळावें. तारीख १० जानेवारी सन १९०३ इ.

आकोला.
ता. १०।१।०३

A. N. Eliopulo
एजंट, रायली ब्रदर्स एजन्सी


## नोटीस

रा. रा. त्र्यंबक बळवंत जोशी राहणार निमकर्दे ता. बाळापूर यास:—

मौजे निमकर्दे येथील नंबर ४१ व टाकळी येथील नंबर ४४ ह्या शेतांत माझे हिस्से आहेत हे तुह्मास माहीत असून तुह्मी रा. गोपाळदास यांजपासून मे १९०२ महिन्यांत दोन्ही शेतांतील ½ हिस्से खरेदी घेतले व खरेदीखत सप्टेंबर १९०२ महिन्यांत रजिष्टर केलें. केवळ पीक खाण्याचे इराद्यानें तुह्मी मजपाशीं असें कपट केलें व आतां खरेदीचे रुपये घेण्यास तयार आहां असें कळविता. खरेदीचे रुपये ४०० मी तुह्मास जून १९०२ महिन्यांत देण्यास तयार असतां तुह्मी रुपये ४०० घेण्याचे नाकबूल केले व आतां ४०० व खर्च ५॥!= मागता तर या नोटिशीनें अजून तुह्मास कळवितो कीं यंदाचे पिकाची किंमत रुपये १२५ ती रकम रुपये ४०० यांतून वजा जातां बाकी रकम रुपये २७५ मी रा. रामलाल जिवनराम साहू निमकर्दे यांजपाशीं अनामत ठेविले आहेत. ते ही नोटीस पावल्यापासून चार दिवसाचे आंत घेऊन जाऊन मला खरेदीखत करून देऊन तें नोंदून द्यावें. व शेतें माझे कबजांत द्यावीत. तसें तुह्मी करण्यास चुकल्यास रीती प्रमाणें तुमचेवर दावा करून शेताचा कबजा व कोर्टखर्च भरून घेतला जाईल. तुमचे रुपये ५॥!= बद्दल मी कोणते ही प्रकारे जबाबदार नाहीं. कळावें. ता. १०।१।१९०३ इसवी.

सही
सोनाजी वलद एकोबा सोनार
राहणार निपकर्दी
दस्तुर खुद्द.


## WANTED

*Oriental Government Security Life Assurance Company Limited*

Wanted an energetic and influential travelling Agent. Salary Rupees fifty per mensum and travelling allowance and usual Commission on business secured.

Apply at once to
M. DESOUZA
Chief Agent for C. P. Berar and Khandesh.

Nagpur
10th January
1903


## वर्तमानसार

**गोवधाचा अनर्थ**— न्यायी इंग्रजी राज्यांत गोऱ्या फौजेसाठीं गेल्या ४९ वर्षांत हिंदुस्थानांत गोमांसा करितां ६१९९३७९ गाईंचा वध झाला. काय अनर्थ हा ! !

**नवी युक्ति**—सिम्निर पितो नांवाच्या एका इटालीयन माणसानें समुद्रांत बुडून बराच वेळ काम करतां येण्याजोगी एक आगबोट तयार केली आहे. शत्रूची आगबोट बुडविण्यास आजपर्यंत पाण्यांत बुडणाऱ्या आगबोटी होत्या पण बुडालेला माल पुन्हा वर आणतां येण्यास कांहीं साधन नव्हतें व तें या पितोनें शोधून काढलें आहे. समुद्रांत दिसण्याकरितां एक प्रकारचा उजेड रसायन शास्त्रानें तयार करतां येतो. ह्मणजे या दोन युक्त्या एके ठिकाणीं मिळाल्या असतां सगळा समुद्र वर आणतां येईल. व पीतोच्या आगबोटींत बसलें असतां हवेसाठीं पाण्यावर आल्या शिवाय लागेल तितक्या खोल पाण्यांत दोन माणसांस सारखें १२ तास काम करतां येतें ! लागेल त्या खोलीवर या आगबोटीस स्थिर होता येतें व तळावर गेल्यावर वाटेल तिकडे गाडी सारखें जातां येतें.

**विशेष सुधारणा**— धारवाडा कडील नायकिणींनीं एक नाटक मंडळी काढली आहे. तींत सर्व प्रकारें काम करणारीं पात्रें स्त्रियाच आहेत. पुरुषांच्या नाटकापेक्षा स्त्रियांचें नाटक लोकांस विशेष आवडतें व त्यांत विशेष रंग खुलतो ह्मणतात. ह्या कालांत पुरुषास स्त्रिया होण्याची व बायकास पुरुष होण्याची फारच आवडी लागली आहे !

**दारू पिण्यानें वेडे झाले**—विलायतेंतील लोक दारू पिण्यानें १०८०० पुरुष आणि ९८०० स्त्रिया वेड्या झाल्या आहेत.

**मुलाची हौस**— बेळगांव येथील एक जैनाची बाई माहेरा बाळंतपणास गेली आणि तिला झालेली मुलगी मेली. पुढें नवऱ्याचा रोष होईल ह्मणून तिनें एक लहान मुलगा ८० रुपये देण्याचें कबूल करून घेतला व रोख २० रुपये देऊन मुलासहीत नवऱ्याचे घरीं आली मुलास पाहून नवऱ्यास संतोष झाला; परंतु बाकी राहिलेले ६० रुपये मुलाच्या बापास न मिळाल्यामुळें तो तो मागण्यास तेथें आला. तेव्हां बाईच्या नवऱ्यास ही लबाडी कळली. ते वेळीं त्यानें ज्याचें मूल त्यास देऊन आपल्या बायकोसहि निरोप दिला. बापडी मुलांबद्दल हपापलेली बायको या लबाडीनें नवऱ्यास व मुलास अंतरली.

**बटाट्याचे चेंडू**— बटाट्यास कांहीं रासायनिक प्रयोग करून त्याचे चेंडू तयार करतात.

**भिकाऱ्यासाठीं वर्तमानपत्रें**—पारिस मध्यें भिकाऱ्यासाठीं वर्तमानपत्रें निघतात. या पत्रांत "अंधळा, लंगडा, थोटा पाहिजे" अशा जाहिराती असतात. तसेंच जागजागचे उत्सव, यात्रा यांची माहिती दिल्यानें भिकारी लोक त्या त्या ठिकाणीं जातात.

**कुत्र्याबद्दल दंड**— पुण्यास एका गृहस्थाच्या कुत्र्याच्या भोंकण्यानें त्रास होत होता. याचा बंदोबस्त व्हावा अशी पोलिसांनीं त्यांस बरेच वेळां ताकीद दिली असूनही ती त्यानें मान्य न केल्यावरून पोलिसांनीं त्यांजवर खटला केला. चौकशी होऊन त्यांस १० रुपये दंड झाला. लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

**नवीन यंत्रें**—मुंबईत कांहीं उद्योगी मंडळीनें अमेरिकेंतील धुण्याचीं यंत्रें आणिलीं आहेत. त्यांत कपडे ४० मिनिटांत स्वच्छ धोव्यासारखे धुऊन निघतात.

**शहाच्या बायका**— इराणच्या शहाला १७०० बायका होत्या, त्यापैकीं त्यानें ६० ठेवल्या व बाकीच्या कमी केल्या. त्यामुळें कांहीं इराणी लोक रुसले आहेत. त्यांचें ह्मणणें, शहाला निदान १९०० तरी बायका असाव्यात !

**आर्टिशिअन विहिरी**— नरानी लोक आपल्या आर्टिशियन विहिरी कळकाचे नळ्यांच्या बनवितात. त्यांना एकंदर खर्च चाळीस रुपये येऊन त्यांचें काम दहा बारा दिवसांचे आंत पुरें होतें. अशा आर्टिशियन विहिरी, नवीन बांबूंच्या नळ्या घातल्या शिवाय बरींच वर्षें टिकतात असाही जपानी लोकांचा अनुभव आहे. आपल्या इकडे असें करून पहावें.

**महारोगावर औषधी**— कांटन येथें अलिकडे अमेरिकेचे मिलटरी खात्यांतील रेझाश्ग नांमें कोणी डॉक्टर आले असून, ते रक्तपितीचे रोगी बरे करण्यांत फार प्रसिद्धीस आले आहेत। या रोगावर या डाक्टरास एक रामबाण औषध सांपडलें असून, त्याचा आश्चर्यकारक प्रभाव दिसत आहे. चीनचे अमेरिकन वकिलांचीहि या उपायाचे उपयुक्ततेबद्दल खात्री झाली आहे. या रोगाची १४ माणसें त्यांनीं साफ बरी केली असें समजतें.

**बळी तो कान पिळी**— चीनमध्यें 'युनिव्हर्सल गॅझेट' नावाचें एक पत्र निघत असतें. त्यांत ह्मटलें आहे कीं, आपणास सुधारलेले ह्मणविणाऱ्या इंग्लंड व अमेरिका यानीं 'चिनी लोकांस येण्यास मनाई' अशा पाट्या आपापले दारांवरून लावल्या आहेत. हा प्रकार परदेशस्थ व्यापारी लोकांचे वरांतून दृष्टीस पडतो.

आपण आपला देश शक्तिमान करीपर्यंत इतरांकडून आपला मरातब राहणें कठीण आहे. जोंपर्यंत आपल्या राष्ट्राची उन्नति व अवनति या दोहोंविषयीं सारखेच बेफिकीर आहों तोंपर्यंत आपण एक दिवस गुलाम होणार हेंच ह्मणणें योग्य होय.

चीनी लोकांस कोणत्या प्रकारें रशिया वागवीत आहे? फेंगटीन वेतरपासून कुत्र्यापेक्षांही रशिया त्यांस वाईट रीतीनें वागवितो आहे, हा अनुताप फार चांगला आहे. तो नुसता लेखांतच न राहतां जर हृदयांत राहून कृतींतही दिसेल, तर चीनच्या पुराण राष्ट्राच्या उद्धाराचे कामीं तो लहान सहान उपयोगी पडेल असें नाहीं.

**गमतीचा पलंग**— दिल्ली येथील प्रदर्शनमध्यें डाक्याच्या एका कारागिरानें एक पलंग पाठविला आहे. त्यावर निजलें ह्मणजे त्यावरील पंखा आपोआप हालू लागतो !

**मनस्वी थंडी होती**— उघड्यावर पाणी ठेवल्यास थिजेल, इतकी थंडी दिल्लीस होती. सर्व कपडे व पांघरुणें घेतलीं तरी पहाटेस हुडहुडी भरत. यावरून तंबूंतील लोकांच्या सुखाची कल्पना होईल.

बंगलोर येथें १०० वर्षांचें जुनें सेंटमार्क नांवाचें ख्रिस्ती लोकांचें देऊळ आहे. त्याचा मनोरा १८० फूट असून एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहणानिमित्त त्यावर शिखर चढवून त्यांत ८ नव्या घंटा बांधावयाचें ठरलें. त्याप्रमाणें ८० हजार रुपये मंजुरी मिळवून काम चालले होतें पण गेल्या ता० १९ रोजीं तो मनोरा एकाएकी खालीं कोसळला! प्राणहानी मात्र झाली नाहीं.

**जेवण्याची सोय**—रेल्वे स्टेशनावर खाणावळी नसल्यामुळें प्रवाशी लोकांस फार अडचणी येत असत परंतु या अडचणीकडे रेल्वे कंपनीचें लक्ष जाऊन त्यांनीं "मोठमोठ्या स्टेशनावर खाणावळी उघडण्याची तजवीज करणें आहे. करितां ब्राह्मणांनीं अर्ज करावे" अशा प्रकारची जाहिरात नुकतीच दिली आहे. अशा तऱ्हेच्या खाणावळी झाल्यास प्रवाशांचे हाल चुकतील यांत संशय नाहीं.

**मानसशास्त्रांत नवीन शोध**—नाडी पाहून उत्कृष्ट वैद्य, रोग्यानें विशिष्ट पदार्थ सेवन केल्याचें सांगतात. महाडकर ज्योतिषी चेहरा पाहून जन्माची वेळ बरोबर सांगत असत. ह्या गोष्टी अनिर्वचनीय मानस शास्त्राच्या आधारें संपादन करितां येत असाव्या असें वाटतें. महाडकर ज्योतिषी चेहरा बघून जन्मकालच सांगत असत. व त्यांना चेहरा बघते वेळीं माणसाच्या अगदीं जवळ जावें लागत असें आता जो एक नवीन शोध लागला आहे तो लक्ष्यात घेतला असतां १०–१९ फूट लांबीवरूनही मनुष्याकडे पाहून त्याचा जन्मकालच नव्हे परंतु तो दमला आहे किंवा हुषार आहे हें सांगतां येते. श्रमाचें अत्यंत सूक्ष्मावस्थेंतील पूर्व रूप नवीन लागलेल्या शोधामुळें आतां समजूं लागलें आहे.

**कळसूत्री बाहुल्यांचें नाटक**-- हें नाटक चमत्कृतिजनक धर्तीवर आहे नेहमींच्या खेळांतील पात्रें सजीव मनुष्यें असतात, ह्या खेळांतील भूमिका लांकडाच्या निर्जिव मूर्ती आहेत; पहिल्यांत भाषण व गायन मनुष्यें जेथल्या तेथें करित असतात, पण दुसऱ्यांत हीं कामें दोघा नाट्यकुशल आचार्यांना करावीं लागतात, तरी पण भाषण व गायन निर्जिव मूर्तीच करीत आहेत असा भास होतो; पहिल्या प्रकारच्या नाटकांत जिवंत मूर्ती अभिनय व नर्तन करितात; पण या दुसऱ्या प्रकारच्या खेळांत निर्जिव मूर्ति ह्या सर्व क्रिया करित असतात. पाहणाऱ्यांस हा संगीत प्रयोग जिवंत माणसेंच रंगभूमिवर येऊन करीत आहेत असा भास होतो. ही कला एक तप पर्यंत मेहनत करून विजापुराकडील रा. गोपाळाचार्य यांनीं प्राप्त करून घेतली आहे.

**९ लक्ष प्रती**—ज० डीवेट यांनीं बोअर लढाईचा जो इतिहास लिहिला आहे, त्याच्या ९ लक्ष प्रती युरोपांत मागितल्या आहेत !

मि० क्रूगर हे दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहण्यास परवानगी मागत आहेत, याबद्दल पुष्कळ युरोपियनांप्रमाणें बोअर लोकांनाही आश्चर्य वाटत आहे ! कांहीं जणांचे उद्गार, तशी त्यांना परवानगी देऊं नये असें असल्याचे कळतें.

**जपानी लोकांची चाल**— पुरुष व बायका सर्वजण नागव्यानें स्नानें करितात. याची त्यास लाजलज्जा वाटत नाहीं. सर्व एकत्र स्नानें करितात. नदीनाल्यांतून नागड्यानेंच स्नान होतें. यास सरकारची हरकत नाहीं, पण रस्त्यांतून तसें जाण्यास बंदी आहे. घरांत पुष्कळजण नागेच वावरतात. व कारखान्यांही मजूर लोक नागेच राहतात. ह्या दिगंबर वृत्तीला आताशा आळा पडत चालला आहे. आपल्या इकडेही उघडीं नागडीं फिरणारीं मुलें आतां पूर्वीं सारखीं फारशीं दृष्टीस पडत नाहींत.

**पुरी ओळखी ठेवा**— आपल्या हिंदुस्थाना संबंधानें सर्व इंग्रज लोक सारखेच उदासीन आहेत. सर्वांचे मुख्य विचार, धोरण व मतें हीं एकच आहेत. अमुक साहेब आला हितकर्ता व अमुक साहेब हितशत्रू आहे ही समज वृथा होय. कोणास निंदावयास नको वा वंदावयास नको. कोणी आपले शत्रूही नाहींत वा मित्रही पण नाहींत. आपलें नातें सर्वांशीं सारखेंच आहे. ज्या प्रमाणें नाटकांतील मंडळी सर्व एकच पण रंगभूमिवर मात्र आपापल्या भूमिकेप्रमाणें निरनिराळी भासतात, व सर्वांचा हेतू नाटक उत्तम वठावें हाच असतो, ज्याप्रमाणें कोर्टापुढें पक्ष प्रतिपक्ष ह्मणून जे वकील शत्रू दिसतात तेच ती भूमिका संपल्या बरोबर परस्परांच्या गळ्यांत गळा घालतात, किंवा ज्याप्रमाणें अनेक धर्मपंथ निरनिराळे दिसले तरी सर्वांचे लक्ष परमेश्वर प्राप्ती च असतें त्या प्रमाणें सर्व इंग्रजलोक कितीही एकमेकांविरुद्ध दिसले तरी सर्वांचें लक्ष्य स्वदेश कल्याणा कडेच आहे. व ते कितीही विरुद्ध वागले तरी त्यांचा तो कार्यभाग आटोपतांच ते प्रेमानें हातांत हात घालून जातात. तरी ही ओळख विसरूं नका.

**एकवीस लक्षांच्या विड्या आल्या**— सन १९०१ ते १९०२ मध्ये हिंदुस्थानात परदेशाहून एकंदर २१ लक्ष रुपयांच्या विलायती विड्या आल्या. याचा काय अर्थ व अनर्थ आहे याचा विचार करा.

**भाकरीबरोबर चिखल व दगड खातात**— जर्मनींत कित्येक ठिकाणीं भाकरीबरोबर लोणी न खातां एका देशांतील चिखल खातात, त्यास ते दगडी लोणी ह्मणतात. स्वीडन, सार्डिनिया, पर्शिया, न्यूबिया येथें भाकरीबरोबर एक जातीचे दगड भाजून खातात.

**जनावरांच्या प्रदर्शनांत बक्षिस**—हिंदुस्थान सरकारानें दरसाल २९०० रुपये बंगाल्यातील जनावरांच्या प्रदर्शनांत बक्षिसें देण्यास खर्चण्याची मंजुरी दिली आहे. त्यायोगें तिकडे गुराढोरांची चांगली सोय होईल असें दिसतें.

**हुडी खाऊन मेले**— पंढरपूर येथें तीन व नजीकच्या गांवीं दोन इसम शेतांतून हुडी खाऊन घरीं येतांच थोड्या वेळानें मेले असें प्रसिद्ध झालें आहे. हुड्यांबरोबर कांहीं किडे पोटांत जाऊन हा प्रकार झालेला असावा.

आकोल्यातील लोकांस ................१ रु.
बाहिरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास ..............................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ८१ ८६
दुसरे खेपेस .... ..... ....८१

REGISTERED N. No.

Town ... ... ...
Mofussil ... ... 2 ;( with postage
All Subscriptions to be paid in)
advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXVII AKOLA MONDAY 19 JANUARY 1903 NO 3

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १९ माहे जानेवारी सन १९०३ इ० अंक ३


### विज्ञापना

( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनांत योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदारांचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल या मानानें आह्मी वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर– वऱ्हाडसमाचार

### नोटीस

नोटीस बेशमी– सखाराम गंगाराम कुलकर्णी मुकाम सावरगांव हल्लीं वस्ती गाडेगांव खुर्द ता. जळगांव जि. आकोला यांसी:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी आपले घरीं फार जुना नोकर असून काम इमानें इतबारें केलें असून तुह्मास पसंत होतें. माझे नोकरीचे पैसे आपणाकडे राहिले आहेत ते देण्याविषयीं पुष्कळ वेळां तुह्मांस ह्मटलें असतां आपण दिले नाहींत. आपलें ह्मणणें कीं:— "जसा दिनानाथ बाबाच्या दुकानच्या माझ्या कर्जा-बद्दल आपण निकाल केला. तसाच लक्ष्मण दास भगवानदास साहू दुकान जळगांव याचे दुकानच्या माझ्या कर्जाचा निकाल करीन." आपण रुपये न पटाविल्यामुळें सदर्हू सावकारानें दिवाणींत दावा करून माझ्यावर हुकूमनामा मिळविला असून आपणांस माहितच आहे. करितां कळविण्यात येतें कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत त्या कर्जाचा निकाल करून आह्मांस सदर्हू सावकाराची पावती आणून द्यावी. नाहींतर दिवाणींत दावा करून कोर्टखर्चासुद्धां रक्कम आपणांपासून भरून घेतली जाईल. कळावें तारीख ११ जानेवारी १९०३ इसवी.

सही
बाळकृष्ण सोनाजी मुकाम
पिंपळगांव काळे दस्तुरखुद्द

### नोटीस

रा. रा. रामचंद्र मयाराम मारवाडी राहणार मोरगांव काकड्याचें ता० आकोला पोस्ट कुरणखेड यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं मी अंदाज एका वर्षापूर्वी तुह्मांस कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. पण तुमचे काम आह्मांस पसंत नाहीं सबब आह्मी आज तारखे पासून तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. या पुढें तुह्मी आमचे संबंधानें कोणचीही देवघेव करूं नये. केल्यास त्याची सर्व जबाबदारी तुह्मांवर राहील. शिवाय ही नोटीस पोचल्यापासून चार दिवसांचे आंत मजला दुकानदाराचें तुमचे जवळ असलेले सर्व कागदपत्र व हिशोब द्यावा. असें मुदतींत न केल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज केली जाईल. आणि याकरितां जो खर्चवेच लागेल तो तुह्मांवर पडेल. कळावें तारीख १३-१-०३ इ०

( सही )
मोतीलाल व रामनाथ उभयता
अज्ञान पालन करणार मातोश्री
चंद्रभागाबाई जवजे रामगोपाल
राहणार मोरगांव नि.
खुद्द हातची.

### जाहिरात

या लेखानें तमाम लोकांस जाहीर केलें जातें कीं, आह्मी रा. रामचंद्र मयाराम मारवाडी यांस मुखत्यार नेमले होते पण आज पासून त्याचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे सबब ज्याजबरोबर आमच्या संबंधानें कोणी कसलाहि व्यवहार करूं नये. या उपर केल्यास त्या बद्दल आह्मी किंवा आमची इस्टेट जबाबदार नाहीं. कळावें ता. १३।१ १९०३ इ.

सही
मोतीलाल व रामनाथ उभयता अज्ञान
पालन करणार मातोश्री चंद्रभागाबाई
जवजे रामगोपाळ राहणार मोरगांव
निशाणी खुद्द हातची

### जाहिरात

ह्या नोटिशीनें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं मुनिसिपल सेक्रेटरीनीं निवडणुकी संबंधाचे ६ वे नियमा प्रमाणें मत देणार लोकांची यादी तयार करून नियम ७ प्रमाणें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं तिच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्यांना मत देण्याचा अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येतें कीं, त्यांनीं आपली नांवें सदर्हू यादींत दाखल आहेत किंवा नाहींत हें पाहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती व ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्यांनीं आपण कोणत्या वार्डांत मत देणार हें तारीख ५।२।१९०३ इसवीचे आंत कळवावें.

१ मे० डेप्युटी कमिशनर साहेब यांची कचेरी.
२ स्माल काज कोर्ट
३ तहाशिल कचेरी
४ कॉटन मार्केट
५ धान्य मार्केट
६ चावडी
७ पोलिस स्टेशन
८ लोखंडी पूल
९ टौन हाल

ता० १५।१।०३ इसवी. } V. A. Kane सेक्रेटरी म्यु० क० आकोला

### NOTICE

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary under rule 6 of the Berar Municipal Election Rules, are posted as required by rule 7, at the following places.

Persons entitled to vote under rule 3 are requested to see if their names are included in the lists posted and make complaints if there be any under rule 8 and if they are entitled to vote in two wards under section 5. to choose the ward in which they wish to vote, before the 5th of February 1903. The names of the places where the lists are posted are as follows:—

1 The Deputy Commissioner's Office.
2 Small Cause Court.
3 The Tahsili.
4 The Chawree.
5 The Police Station in the town.
6 The Cotton Market Office.
7 The Grain Market Office.
8 The Morna River bridge.
9 The Town Hall.

Dated Akola 15-1-1903 } V. A. Kane Secretary Municipal C. Akola.

### नोटीस

नामु वल्लद हरी तिव्हाणे व शामु वल्लद हरी तिव्हाणे राहणार वाडी अदमपूर पोस्ट तेल्हारा, तालुके आकोट. यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत कीं विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा आकोले यांच्या कोर्टांतील दिवाणी मुकदमा नंबर ५७१/१९०१ ह्यांत झालेला हुकूमनामा व तुमचे वडील रा. हरी वल्लद पूर्णाजी तिव्हाणे ह्यांनीं तारीख ३।२।१८८७ रोजीं आमचे पक्षकार शिवलाल गुलाबचंद दुकान तेल्हारे यांच्या नांवानें लिहून दिलेली तीन गहाणखतें ह्यांवरून सदर्हू दुकानचें जें कर्ज तुमच्याकडे निघत होतें त्याचे फेडींत तुह्मी तारीख २२।७।१९०२ रोजीं कांहीं शेतें आमचे पक्षकार यांस खरेदी देण्याचें कबूल करून, त्याबद्दल करारनामा सदर्हू तारखेस तुह्मी आमच्या पक्षकाराच्या नांवानें लिहून दिला; व खरेदी देऊं केले त्या शेतांपैकीं, तुमच्या वहिवाटींत असलेल्या शेतांचा ताबाही दिला. सदर्हू करारनाम्या अन्वयें सदर्हू शेतांबद्दलचें खरेदीखत आमच्या पक्षकाराच्या नांवानें सुमारें आठ दिवसांत करून देण्याचें तुह्मी कबूल केलें असून आज पावेतों तें करून दिलें नाहीं व शेताचें खातेंही बदलून दिलें नाहीं. सबब या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं, तुह्मी केलेल्या कराराप्रमाणें खरेदी दिलेल्या शेतांबद्दलचें खरेदीखत आजपासून पंधरा दिवसांचे आंत तुह्मी आमच्या पक्षकाराच्या नांवानें करून द्यावें. व शेतांचें खातें ही सदर्हू मुदतींत त्यांच्या नांवानें बदलून द्यावें. सदर्हू मुदतींत कराराप्रमाणें तुह्मी वर्तन न केल्यास आमच्या पक्षकारांना तुमच्या वर दावा करणें भाग पडेल. या योगानें तुह्मांस विनाकारण खर्च व त्रास सोसावा लागेल. ह्मणून ही अगाऊ नोटीस तुह्मास दिली आहे. कळावें. तारीख १६ माहे जानेवारी सन १९०३ इ०

( सही )
रामचंद्र विष्णु महाजनि
हायकोर्ट वकील, आकोला

वऱ्हाडसमाचार

मित्ती पौष वद्य ७ शके १८२४

### तेवढीच गोष्ट

सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत, व जन्मल्यापासून मरेपर्यंत एक सारखे आपले अनंत व्यापार चालले आहेत. पण आपण कोण, व काय याची ओळख आपणांस पटली आहे काय? आपण आपल्या मुलांस शाळेंत घालतो, पैसा खर्च करितो पण आपण त्यास ती एकच गोष्ट शिकविली आहे काय? पढित मूर्खां प्रमाणें त्यास आपण अरण्य पंडित करून सोडलें पण त्यास स्वदेशाची ओळख नाहीं, व त्यास त्याचा अभिमान नाहीं तर तें सर्व शिक्षण

मातीमोल झालें नाहीं काय? हा प्रश्न अगदीं सरळ आहे व याचा आपणच आपल्याशीं विचार करा!

तर आपल्या मुलाबाळांत भलतेंच शिक्षण देऊन त्यांचें व त्यांच्या पुढील जन्मांचें मातेरें करूं नका. त्यांच्या शिक्षणावर आपल्या राष्ट्राचें बरें वाईट कल्याण अवलंबून आहे. आणि जों पर्यंत आपली नाव अद्याप खडकावर आपटली नाहीं. व जों पर्यंत पोहणें शिकण्यास आपल्यास अवकाश आहे तोंपर्यंतच आपण आपली तयारी केली पाहिजे. ही गोष्ट आज करूं उद्यां करूं ह्मणून कालावधीवर टाकण्याची नाहीं. ह्यांत विलंब किंवा हयगय होतां कामा नये. आतां आळस सोडून द्या, जरा डोळे उघडून पहा व आपल्या देशाच्या स्थितीबद्दल मुलांस शिक्षण द्या. त्यांस असें शिक्षण दिलें पाहिजे कीं त्या मुळें त्यास, आपपर काय आहे आपले स्वकीय कोण, परकीय कोण; कोण आपले शत्रू व कोण मित्र हे चांगलें ओळखतां यावें. आपल्या देशाची किती गर्भश्रीमंती होती, त्यांत काय काय कलाकौशल्यें नांदत होतीं, व त्यांत कोण कोणत्या विद्या होत्या याची त्यास चांगली माहिती झाली पाहिजे. हल्लीं आपली काय विपन्नावस्था आहे, ती कोणी व कशी केली व ती कशी सुधरेल याचें शिक्षण दिलें पाहिजे. हेंच आपलें वर्तमान काळींचें राष्ट्रीय शिक्षण, उच्च शिक्षण व अत्युत्तम शिक्षण होय. नुसत्या भारामर इंग्रजी, मराठी, किंवा फ्रेंच पुस्तकांनीं तें मिळणार नाहीं. सध्याचें पोकळ पुस्तकी शिक्षण आपल्या उपयोगाचें नाहीं. त्या शिक्षणानें आपण स्वतांस, आपल्या लोकांस, व आपल्या देशास विसरत चाललों आहोंत. आपली हिंमत, कुवत, व शौर्य हीं दूर आपल्या पासून जात आहेत. आपल्या अंगीं कडवा स्वाभिमान नाहीं, स्वदेशाभिमान नाहीं, किंवा आपलेपणाची आपली अशी कोणतीच गोष्ट नाहीं. आपणच आपली ओळख विसरायास लागलों तर दुसरे आपणांस काय ओळखणार आहेत! आपल्या अशा अज्ञानापुढें व वेडेपणापुढें इंग्रज सरकार तरी काय करणार! आपणच आपली कंबर सावरली पाहिजे. दुसऱ्यांनीं रडत राऊ घोड्यावर बसवून कांहीं उपयोग नाहीं. पहा उमजा नाहीं तर,——

## तर्कवितर्क

उमरावतीला सध्यां जळाला कीं जाळला हाच मुख्य विषय सर्वतोमुखीं झाला आहे. राज्यारोहणाचा भव्य व मनोहर मंडप भस्म झाला ही गोष्ट अत्यंत दिलगिरीची होय. परंतु मंडपाला कोणी दुष्टानें आग लाविली किंवा मंडप पेटला या बद्दल शहानिशा चालूं आहे. आमच्या विश्वसनीय बातमीदाराकडुन कळतें कीं, संध्याकाळीं दिवे लागण्याच्या वेळीं मंडपांत मंडळी फिरत असतांना आग लावण्याची कोणा वेड्यापिराचीही छाती होणार नाहीं. आग लावणाऱ्या लोकांच्या गोष्टी अशा नसतात. आग लागण्याला कारणें लोकवार्तेंत अशीं निघतात कीं, एखाद्या विडीनें असा प्रकार झाला असावा किंवा ग्यासाचे दिवे लावावयाचे होते तेव्हां त्या पुडीवर पाणी पडून सर्वत्र ग्यास भरला असावा किंवा कांहीं अनभिज्ञ लोकांच्या ग्यासाच्या पेटीविषयीं चुका घडल्या असाव्या आणि हां हां ह्मणतां पाव घटिकेंत सर्व मांडवाची राखरांगोळी झाली असावी. आह्मांस हीच लोकवार्ता खरी वाटते. चिरूट व विडी ओढणाऱ्यांनीं कोणते अग्निप्रळय केले नाहींत! तसेंच ग्यासाचा दिवा नव्यानें लावणारे कितीसे चुकणार नाहींत! मुद्दाम जाणून बुजून हें झालें असेल असें मात्र मन सांगत नाहीं. या आगीनें जें नुकसान झालें त्याचा अंदाजाच कळत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, दहा हजारांचें सामान जळालें. पुढें दहाचे वीस, तीस, चाळीस, पन्नास हजारांपर्यंत आंकडे वाढत वाढत आले आहेत. ज्याची दहा रुपयांची वस्तु जळाली तो ह्मणतो कीं माझा पन्नास रुपयांचा माल गेला. सामान सुमान गोळा केलें तेव्हां किंमतवार नीट नोंद करून जमा केलेलें नाहीं ह्मणून अशा फरकाच्या गोष्टी ऐकूं येतात. या नुकसानीचें प्रकरण कोठवर लांबेल हें कांहीं सांगतां येत नाहीं. जो तो आपापली वस्तु परत मागत आहे. गरीब बिचारा तहशिलदार!

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशिलदार यांच्या तहशिलदारींतला जसा हा अद्वितीयच समारंभ होता. दरबाराचा मांडव हा त्यांचा महाविष्णु झाला होता. त्यांच्या पुढें सर्वत्र मांडवाची शोभा नाचत होती. अशा मनोनिग्रहानें काम करणारा अंमलदार सक्तीनें करारानें सर्व सिद्धता करील तर नवल काय! त्यांची आह्मांला मोठी कींव येते आणि त्यांच्या सहकारी ग्रहस्थांची व जीवापाड अर्धपोटीं झिजणाऱ्या जागत्या सारख्या नोकरांची मोठीच दया येते. ह्यांच्या डोळ्यांचें पारणें मनोहर मंडपानें फेडलें नाहीं ह्मणून वाईट वाटतें. आनंदाच्या वेळीं त्यांस भागीदार सर्वच ह्मणजे असते परंतु या दुःखाच्या वेळीं जो तो बोट तहशिलदारा कडे दाखवितो. आह्मी रा. रा. कृष्णाजी अनंत यांची बहादरी समजतो कीं, त्यांच्या अंगांत एवढी मोठी शक्ती आहे. सर्व वऱ्हाडांत पहिल्या नंबराचा उत्सव उमरावतीचाच पाहिजे होता, व तो झालाहि ह्यांची राजभक्ती व एकनिष्ठ चाकरी सरकाराला विसरतांच येत नाहीं. मंडपाच्या ट्रेजडीनें या सर्व गोष्टी अगदीं पूर्ण वठल्या आहेत; आणि पुष्कळशा व्यवहारिक गोष्टीही यापासून शिकण्यासारख्या आहेत. आह्मी सरकाराला विनंती करितों कीं रा. रा. कृष्णाजी अनंत यास दोष न लावितां त्यांच्या परिश्रमाचें योग्य चीज करावें.

## मान सांगावा जनांत

दिल्ली दरबार ह्मणजे प्रत्यक्ष श्रीलक्ष्मीचें विलासगृहच होय. तेथें सोन्या रुप्याचा व हिऱ्यामाणकांचा वर्षाव होत होता. अशा रम्य स्थलाच्या नुसत्या नाममात्रें वा दर्शनमात्रें पापच्युति व पुण्यप्राप्ती हीं लाभतात. ज्या नरोत्तमांस ही अपूर्वाईची संधी सांपडली ते खरोखरी धन्य होत. अशा नंदन वनांतील उत्तम हवा खाण्यास सांपडली त्यांच्या आनंदाच्या भरतीस काय उणीव? जेथें पाय ठेवावा, जिकडे हात हालवावा, जिकडे डोळा फिरवावा, जिकडे कान द्यावा, किंवा जेथें वास घ्यावा तेथें तेथें व जिकडे तिकडे आनंदाशिवाय कांहींच मरलेलें नव्हतें. महाराजाधिराजाच्या राज्यारोहणाचे मंगल प्रसंगीं काय उणें पडणार आहे! देशोदेशींचे राजे, योद्धे, व विद्वज्जन, सर्वजण एक मनानें ह्या ठिकाणीं सुयशासाठीं रात्रंदिवस झटत होते. कोणीहि कोणच्याहि गोष्टींत झीज सोसण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. ह्या कार्याची अत्युत्कृष्ट उठवणी होऊन तें निर्विघ्न पार पडलें. अशा प्रसंगाचे वेळीं आह्मी असें थटलों, आह्मी असें नटलों, आह्मी हें पाहिलें, आह्मी तें ऐकलें, आह्मी इकडे मिरवलों, आह्मी तिकडे गेलों अशा मनोराज्यांत आमचीं मनें गढून गेलीं होतीं. असें तें मनोराज्य होतें. आह्मी घरीं जाऊं व तेथें हें सांगूं व तें सांगूं आणि काय न सांगूं अशी एकच मनांत गर्दी उसळली.

आपल्यास मुद्दाम दरबारास बोलावणें आलें होतें; आह्मांस मुद्दाम आग्रहानें, मोठ्या मानमरातबीनें बोलवून नेलें होतें; आह्मांस खूप मजाच मजा दाखविली व मोठ्या प्रेमानें किताबती अर्पण केल्या, अशा डामडौलानें व थाटामाटानें आह्मी दिल्ली दरबार केला. इतकीच गोष्ट आपण सर्वांस पुनः पुनः सांगू. पण आपला

## अपमान सांगावा मनांत

आपला झालेला अपमान तो कांहींहि कारणामुळें असो, तो निवास मात्र बोचला आहे. तो कांहीं आठवणींतून जाणार नाहीं. छे, ज्याचा उच्चारच कशाला करा. पण तो आपण मनांतल्या मनांत ठेविला व बाहेर चकार शब्दहि काढला नाहीं तरी तो लोकांस माहित्याहि, पूर्वींच सजला आहे त्यास काय करावें? लोकांनाहि आपली झालेली मानखंडणा बरी वाटणार नाहीं. पण ती आपल्या तोंडानें सांगणें ह्मणजे मरणप्राय गोष्ट होय. आपण ह्या पेक्षा तेथें गेलोंच नसतों तर कांहीं हरकत नव्हती. तेथें झालेल्या बहुमानांत हा अपमानाचा विषबिंदू पडला नसता तर जरा ऐट होती.

पण आपणच ह्या अपमानाचा कांटा काढून टाकला पाहिजे. ह्या गोष्टीच्या समाधानीची युक्ति शोधिली पाहिजे. कोणी ह्मणतो मला दिल्लीदरबारची हवा बाधली, कोणी ह्मणतो माझी बसण्याची खुर्ची अशीच होती, कोणी ह्मणतो मी हायतोब्यांत सांपडलों, कोणी ह्मणतो माझी कोणी कांहीं तेथें विचारपूस केली नाहीं, कोणी ह्मणतो मला मजभाष झाली, कोणी ह्मणतो आमचा मान बरोबर झाला नाहीं अशीं एक ना अनेक गाऱ्हाणीं. अशा अफाट समुदायांत किंचित लक्ष्या लक्ष झालें असल्यास त्यांत मोठेंसें काय आहे? अशा प्रसंगीं मानापमान आपण विसरूनच गेलें पाहिजे. सर्व कार्य आपल्याच बरें. त्यांत इतका मानपान पाहण्याची जरूरच नाहीं. आपण कोणच्याही प्रकारें मनास वाईट वाटून घेतांच कामा नये.

युक्तीवाद तर छान साधला. पण मन मोठें खोटें. तें उगीच स्वस्थ राहत नाहीं तें ह्मणतें कीं दरबारा सारख्या ठिकाणीं जर मानपान पाहायाचे नाहींत तर मग ते कोठें पाहायाचें! मानपानाची मातबरी तरी अशाच प्रसंगा निमित्त आहे. चारचौघांपुढें मान मिरवायाचा नाहीं तर तो काय घरीं एकटे असतांना करायाचा कीं काय?

वेड्या मना! तुझी समजूत खरी आहे, पण आपण कः पदार्थ आहों व आपला मान करवून घेण्याची आपली शक्ती नष्ट झाली आहे हें तूं विसरलास. तूं बुद्धीबळांतील राजा प्रमाणें काट शहांत पडला आहेस. तूं आपला आधीं शह काढ, तोंपर्यंत तुला दुसरा डावच खेळतां येत नाहीं.

## किंक्रान्त

[ प्लेगाची हालचाल ]

किंक्रान्त ह्मणजे कुदिन समजतात. उत्तरोत्तर प्लेगाचा रोग वाढता आहे आणि सार्वजनिक आरोग्याला किंक्रांतीचे दिवस आले आहेत क्षणोक्षणीं वाटतें. गेल्या आठ दहा दिवसांत प्लेगाच्या रोगाचें खडतर रूप दिसूं लागलें आहे. पुण्याला या रोगाचा कहर उसळला आहे. दररोज १००।१०० माणसें मरतात. मुंबई, नगर, दक्षिण महाराष्ट्राचा बराच भाग इत्यादि ठिकाणीं प्लेगाचें पाऊल पुढें आहे. नागपूरास हा रोग पुनः उद्भवला आहे. खामगांवास मृत्यूचें मान कमी आहे. पण शेगांवास दररोज ८।१० मृत्यु होतात. बाळापूरच्या पेठेच्या भागांत ६।७ मरत होतीं तेथें आतां १२।१५ माणसें मरूं लागलीं आहेत. आकोला शहर इतके दिवस सुरक्षित होतें पण आतां येथेंहि हा रोग उद्भवेल अशी दहशत पडली आहे. कित्येक घरांतून उंदर मेलेले सांपडले व कांहीं उंदीर धडाबड वरून पडून मेले. कोणी ह्मणतात कीं दोन चार उंदिराच्या डोळ्याजवळ फोडही दिसून पडले. चौघापांच जणांनीं आपलीं घरेंहि सोडून दिलीं आहेत.

आकोला मोठें शहर आहे. येथें प्लेगानें ठाणें बसलें ह्मणजे पुष्कळ माणसांचा संहार झाल्या शिवाय राहणार नाहीं. प्लेग जातो तेथें तो गांव उजाड करून सोडतो. ही गोष्ट डोळ्या पुढें आहे. गांवाच्या निरनिराळ्या नाक्यावर पाहेरकरी ठेविले आहेत ते बाहेरून येणाऱ्या लोकांची यादी ठेवितात या सर्व गोष्टी ठीक चालल्या आहेत. पण खऱ्या खर्चाच्या बाबीकडे कोणीच लक्ष पुरवीत नाहीं. डाक्टर रेली साहेब रोगाचा प्रतिकार करावा ह्मणून रात्रंदिवस झटत असतील परंतु प्रत्यक्ष दृष्टीला कांहींनें गोष्ट दिसून येत नाहीं. शहराच्या मानानें प्लेगासाठीं निराळ्या व्यवस्था नाहींत. प्लेग शेड ह्मणजे प्लेगाचा रोगी निराळा ठेवण्याची झोपडी. या झोपड्या व शीत उष्ण हीं सारखीच देतात. निवाऱ्याची जागा ह्मणून ती कांहींच उपयोगी नाहीं. या झोपड्यांत रोग्याला ठेवण्यापेक्षां एखाद्या जंगलांत ठेवणें फार बरें! पुन्हा त्याची कटकट तरी राहणार नाहीं. आपतेजादि पंचभूतें त्याला आपलासा करून टाकतील. जे सुखवस्तु लोक आहेत त्यांची काळजी सरकारला नको; परंतु जे पोटभरूं काबाडकष्टवाले आहेत, व ज्यांना उद्यांची मारामार आहे अशा लोकांसाठीं कांहींच बंदोबस्त नाहीं. प्लेगाचा बंदोबस्त नीट व्हावा, लोकांस या आपत्काळीं योग्य ते उपचार मिळावे व डॉक्टरांनीं आपल्या भूतदयेची पराकाष्ठा करावी असा हा प्रसंग आहे. आमचे जिल्हा अधिकारी कुमार श्री हरभामजी रावजी हे फार दक्ष आहेत, व यांच्या उत्तम बंदोबस्तानें ह्या वेळ पर्यंत चांगला निभाव लागला; परंतु या पुढें वरिष्ठ सरकारांनीं त्यांस मोठीच मदत दिली पाहिजे ह्मणजे ते सर्व योजना सुरळीत करून देतील.

## स्थानत्याग

प्लेगाच्या रोगावर औषधीच चालत नाहीं. तो ज्याला होतो त्याला परमेश्वरानेंच वांचवावें; पण तो रोग होण्यापूर्वी कांहीं प्रतिबंधक उपाय योजण्या सारखे आहेत. या उपायामध्यें स्थानत्यागा सारखा उत्कृष्ट उपाय कोणताच नाहीं. ज्या स्थळीं हा रोग होतो तेथील उंदीर प्रथम पटापट मरूं लागतात; आणि अशी गोष्ट सांगतात कीं, उंदीरही स्थानत्यागाचा उपाय उपजत बुद्धीनेंच करूं लागतात, पण ते जातां जातां पुष्कळसे मरतात व रोगाचें बीं अधिकाधिक उंदिराच्या प्रवासानें लांबवर पसरलें जातें. बाहेरून हा रोग प्रथम येतो हें खरें, पण तो स्थाईक होण्याला फार काळ लागत नाहीं हा रोग हवेंत खेळता राहतो ह्मणा किंवा याचे कृमी भूमिगत असतात ह्मणा, ज्या स्थळीं हा होतो तें स्थळ सोडून द्यावें हा उत्तम मार्ग होय. कांहीं प्रकृती या रोगाला तत्काळ वश होतात असा अनुभव आहे परंतु या प्रकृती कोणत्या आहेत याचें निदान अद्याप होत नाहीं. माणसांनीं उपाय करण्याचे ह्मणजे ते अतः- स्वच्छता राखावी मोकळ्या हवेंत राहण्याची व्यवस्था करावी व प्लेगाच्या स्थळा पासून दूवर पळ काढावा. हे उपाय लिहिण्याला नीट दिसतात पण ते अंमलांत आणण्याची गोष्ट अत्यंत कठीण आहे. ज्यास जी गोष्ट जितकी साधेल तितकी करून पाहावी ह्मणजे ईश्वर अंशतः तरी कृपा करील !

---


## The Berar Samachar

MONDAY JANUARY

19 1903


The future of Berar is a trump card in the game of its *practical* annexation to the British empire. A few men like Lord Curzon migh know the inner secret but the outside public is left to the kingdom of a guess—work. There are very many rumours about the amalgamation of these Hyderabad Assigned districts. One thing is however certain: The province will not continue to be a separate empire in itself. Like Greece in the Western Continent, Berar was till now a small nation complete in itself. It enjoyed independence of a peculiar nature, It defied allegiance to the parent stock. Though nominally a part of the Nizam's dominions, it had however a separate existence. Nor was it a British province. It participated in a unique political independence though the British administration has brought it under a complete control. Thus Berar was virtually under a double government though it owned no Goverment at all. The surplus of revenues over the cost of administration was the annual portion of the Nizam's sovereignty over it. The full enjoyment of administrative control was the share of the British Government. In theory at least Berar had a proud position. It was our privilege to mention great principles of independence though all that was in perfect consonance with loyalty to the Native state and to the paramount power as well.

There is now going to be a great change in the status of this province. The old political greatness of the last half a century is a matter of history and we shall often miss the panorama of a presidencial administration in a province like Berar.

We are doomed to form a portion of a big presidency. We shall have to accustom ourselves to the new changes in the administration. There are many a rumour afloat about the future of Berar. We do not know what is likely to happen but it is as well pleasant to narrate the possibilities of our future. Most people will have it as settled that this province will be joined to the Central Provinces. The natural position of Berar will surely commend itself to be recognized as a portion of the Central Provinces of India. The form of administration is more or less similar to what prevails on the Nagpur side though the educational machinery corresponds to the scale of the Bombay Presidency. There is always a room for favouritism in this province as in the Central Provinces. The Government has a wide field to provide high posts for their chosen few. Besides, the annexation to the C. P. is more likely to continue the *despotic* tone of administration. There is a peculiar way of expressing this despotism. It is allowable on all hands in these non—regulated provinces. Such a mode of thinking takes for granted that there is no regulation. We would only say that there is as much regulation as will suit the conveniences of the persons in authority. It is at least supposed that there is more of whim than of reason in the administration of these non—regulated provinces. We however see no reason to approve or to disapprove of the union of Berar with the Central Provinces.

There is also a proposal in popular talk that Berar is to be a collectorate of the Bombay Presidency. A change whatever it be, is welcome because of its novelty and of our preparedness to meet any contingency. We are accustomed to think of ourselves as if in unison with the Bombay administration. Many branches are formulated on the adaptation of the Bombay scheme. Though we are more to welcome the Bombay Government there is howeve a decided opinion of the people against such amalgamation. We do not know how to support it by reason and we cannot help confessing to this sentiment of averseness to whatever comes from the Bombay side. There is also a third rumour which, if true, has a very wide and comprehensive scheme. It purports to the effect that the Maharashtra is to form our presidency of the Marathi—knowing population. If so the province of Sindh will be joined to the Punjab, some of the divisions of the Central India will go to the United provinces and some eastern portion of the Balaghat side will be joined to the Bengal presidency. This scheme is a grande one and we feel that as a change is to come on us let it be a grand one extending over at least three-fourths of the Indian empire.

—:0:—

Lord Standly of Alderley has, in connection with the Berar questi on, stated some of the more notable instances of depletion of Hyderabad Treasury, directly or indirectly by British subjects:—

1. A lakh (100,000) rupees nominally for a consultation fee; but really to conciliate the British Residency and the Simla Political Department. Was not the Government of India's consent needed and given for this payment? and on what pretext?

2. The £ 30,000 (more or less) given about 1887—8 on a claim already met by a very large payment out of Hyderabad revenues, This exaction was made directly through the British Residency.

3. Large sums, tens of thousands, were paid through Abdul Hak in buying up from Anglo—Indian officials their then share in the Dekkan Mining Company.

4. Purchase by the Nizam of the Government of India, Railway between the G. I. P. and Secunderabad was forced on the Hyderabad Government by the Government of India, through the Residency, at probably £100,000 excess of value.

5. Costly barracks were constructed at Secunderabad, Balorum, etc., out of Berar revenues, thus swallowing up, during several years, the surpluses which should have gone into Hyderabad revenues, according to the terms of the Assignment Treaty. Also, during many years, the P. W. D. ran riot in the Berars and diminished the surpluses by lavish and unnecessary expenditure on public works. Some of this was for Irish bridges. I have not been able to discover that this term is known to engineers—it appears to describe bridges with no water to run under them.

6. The Nizam's offer of 60 lakhs to the Indian Government in aid of its military expenditure was cajoled or extorted from the young Prince. This has been commuted, so to speak, in the subsequent heavy expenditure for the upkeep of the Imperial Service troops.

7. The Hyderabad Contingent has been maintained out of the Berar revenues at high charges, though transfer of territory had previously been made by the Indian Government for such purposes."

---

## वऱ्हाडवृत्त

मे० हेअर साहेब जुडिशिअल कमिशनर यांची स्वारी गेल्या शनिवारच्या मेल गाडीनें हैदराबादला गेली. तेथें कांहीं खटले मुद्दाम नेमण्यांत आले आहेत, व तिकडील कोर्टाची तपासणीही करण्यांत येईल. साहेब बहादुरांचा मुक्काम हैदराबादेकडेसच आठ दहा दिवसांचा होणार आहे.

जळून मेली—येथील रा. नरहर बाळ कृष्ण पुराड पिंपळगांवकर यांची बायको विठाबाई गेल्या शुक्रवारीं दिवसा भानोला फोडणी देत होत्या. एकदम जाळ झाला. त्याच्या भपक्यानें तोंड जळालें, अंगावरील कपडे पेटले आणि एक दोन घटकेमध्यें त्या बाई मरण पावल्या !

आकोल्याची एक बाई शेगांवाहून परत आली व लागलीच आजारी असल्याचें दिसलें. प्लेगाची गांठही आली होती. सोमवारीं तिला प्लेगाच्या शेडमध्यें नेलें. व सहा दिवसांनीं ती मरण पावली. आकोल्यास बाहेरून आलेला हा दुसरा प्लेगाचा रोगी होय !

येथील बद्रिमनजी धर्मशाळेची देखरेख नीट होत नाहीं आणि तेथें शौचकूपाची मोठीच गैरसोय आहे. या कारणानें शिष्ट संभावित लोकांस तेथें उतरण्या संबंधानें अनेक अडचणी येतात अशाविषयीं पुष्कळशा गृहस्थांच्या तक्रारी आह्मांकडे आल्या आहेत. मुनसिपालिटीनें धर्मशाळेकडे जलदी लक्ष्य पुरवावें असें आह्मी सूचवितों.

अत्री मलकापूर ता. बाळापूर येथें एका रजपुताला खानगी द्वेषामुळें मोठी दुखापत करण्यात आली आणि त्यांतच त्याचा अंत झाला असें कळतें.

पोलीसाची सुस्ती— आकोला-आकोट सडकेवर मोठमोठे डाके व चोऱ्या होत असून रस्ता मोठ्या धोक्याचा झाला आहे. तीन वर्षांच्या काळांत पोलिसाकडून बंदोबस्त होत नाहीं हें लाजिरवाणें होय.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥≈ |
| सोनें | २४।≈ |
| चांदी | ६०॥– |
| जवस | ११९ |
| जवारी | १० ते १२॥ |
| गहू | ८९ ते १०० |
| बाजरी | ९९ ते ६० |
| मीठ | ३॥।≈ रु. मण |
| चणे | ३ ते ३॥ रु. मण |
| तूप | ७॥। रु. मण |
| तेल | ६८= रु. मण |
| रुई | ९३- ६३ |
| सर्की सट्टा | हाजर ९॥= |
| कपासी | ३८-३६॥ |

---


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचे, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचे, व दोन्ही क्वाटर हाऊसीसचे कर वसूल करण्याचे, सन १९०३-१९०४ सालचे हक्कांचा लिलाव ता. १६ फेब्रुआरी १९०३ रोजीं सकळीं आठ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें ता० १७ जानुआरी १९०३ इसवी.

V. A. Kane.

सेक्रेटरी म्युनसिपाल कमिटी

आकोला.


---


## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाठव्यापर्यंत किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्याचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. दर्शन निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. २ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ९०६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ स. मा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई.


---

## वर्तमानसार

**श्रीमान गाणारीण—** युरोपांतील मॅडमपाटी नांवाची गाणारीण, आहे तिनें एका वर्षांत ७०००० पौन्ड गाण्यावर मिळविले. एके दिवशीं ३ तासामध्यें तिला १००० पौन्ड मिळाले. तिच्या एका गाण्यास ६०० पौन्ड द्यावे लागतात. अमेरिकेंत हिंडत असतां एकेका रात्रींत तिनें १२०० पौन्ड मिळवले. एकदां कान्व्हेंट गार्डनमध्यें दर मेफलीस ८०० पौन्ड ठरविण्यांत आले होते. पण विशेष आश्चर्याची गोष्ट अशी कीं तेथेंच तिनें अमुक मुदतीपर्यंत इतर ठिकाणीं गाऊं नये ह्मणून तिला १२००० पौन्ड देण्यांत आले! सगळेंच विचित्र!

**चमत्कारिक चाल—** कोरिया येथील राजघराण्यांत मृत्यु घडला असतां तेथील लोकांस तीन वर्षे पांढरी टोपी परिधान करून शोकचिन्ह पाळावें लागतें.

जलद लिहिणारे टाइपरायटर यंत्र—पारीस येथील एका शोधकानें मिनिटास दोनशें शब्द लिहिणारें एक खिशांत ठेवण्यास योग्य असें टाईपरायटर बनविलें आहे.

**अपूर्व गोष्ट—** जमिनीवरून चालणाऱ्या बायसिकले प्रमाणेंच पाण्यावरून चालणारी बायसिकल मुंबईस आली आहे.

**सिंहाचे पिंजऱ्यांत लग्न—** अमेरिकेंत न्यूयार्क येथें एका वधूवरांनीं सिंहाच्या पिंजऱ्यांत लग्न लावून १०० मोहरांचें बक्षिस मिळविलें. वधुवराशिवाय पिंजऱ्यांत उपाध्यक्ष व सिंहाचा रक्षक असे होते.

**पार्लमेंटांत वऱ्हाड—** पार्लमेंट बंद होण्यापूर्वी अगदीं शेवटीं वऱ्हाडसंबंधानें हिंदुस्थान सरकारच्या ठरावा संबंधाचे कागदपत्र पार्लमेंटच्या टेबलावर ठेवण्यांत आले होते असें समजतें. त्या ठरावांत कांहीं कमी जास्ती दिसल्यास विशेष वादविवाद होईल ह्मणून हे कागद इतक्या उशिरा टेबलावर ठेवण्यांत आले असावेत असा अजमास आहे. पण एक इंग्लंडांतील बातमीदार ह्मणतो कीं, इतकी भिती बाळगण्याचें कांहीं कारणच नव्हतें कारण हिंदुस्थानाबद्दल माहिती असलेले लोकच हल्लीं पार्लमेंटांत फार थोडे नाहींत!

**वयोमान—** दर हजारीं एक मनुष्यें १०० वर्षे जगतें; ६०० पैकीं एक मनुष्य ८० वर्षांवर जगतो; व शेंकडा ६ मनुष्यें ६५ वर्षांवर जगतात.

पृथ्वीवर निरनिराळ्या अशा ३ हजारांवर भाषा प्रचारांत आहेत. एकंदरींत पुरुष व स्त्रिया यांची संख्या बरोबर आहे. व लोकांत १ हजार धर्मपंथ आहेत.

**नवीन यंत्र—** एका इटालियन शोधकानें, हायड्रोस्कोप नांवाचें एक नवीन यंत्र तयार केलें आहे. यानें समुद्राच्या तळाचे पदार्थ दिसतात. ग्रीक लोक या यंत्राच्या साहाय्यानें बझरसीसचे किनाऱ्यावर २३०० वर्षांपूर्वी बुडालेलें आरमार शोधून पाहणार आहेत.

**ईश्वरी लीला—** सेबस्टोपल येथें एका आरवलीनें एका लहान मुलास उचलून नेलें लोकांनीं तिचा माग तीन दिवसांनीं काढून आरवलीस मारिलें. नंतर गुहेंत येऊन पाहतां मुलगी शेवाळ्यावर बसून कांहीं फळें खात आहे असें दिसलें. गेले तीन दिवस ती अस्वल आपणांस फळें देत असे, असें या मुलीनें सांगितलें. काय चमत्कार आहे पहा!

**जादूचा अद्भुत प्रयोग—** बंगाल इलाख्यांत झालेल्या एका विलक्षण जादूचे खेळाची हकीकतः—

हा प्रयोग करणारा एक जादुगार (गारोडी) होता. त्याचे जवळ एक चेला १२ वर्षांचा व एक पोतडी मात्र होती. पोतडी मध्यें नानाप्रकारच्या बारिक सारिक जिनसा होत्या. तो पुढें गारोडी पटांगणांत उभा राहिला व त्यानें मंत्रसामर्थ्यानें एक दोऱ्याची लहानशी गुंडी उत्पन्न केली व तिला चेंडू प्रमाणें कांहीं वेळ झेलून तिचें एक टोंक हातांत धरून वर फेंकली, ती दोऱ्यांची गुंडी नेहमींप्रमाणें खालीं न येतां आकाशाकडे जाऊं लागली आणि जातां जातां ती ढगांत नाहींशी होऊन दिसेनाशी झाली. तो गारोडी हातांत धरलेलें टोंक सोडी. पण ती अधांतरीच राही. अशा रीतीनें सुतळी लोंबत राहिल्यावर त्या गारोड्यानें आपला चेंडू नाहींसा झाला ह्मणून विलाप केला, नंतर त्यानें तो चेंडू आणण्यासाठीं चेल्यास त्या दोरीवरून चढवून दिलें. तोही ढगांत जाऊन दिसेनासा झाला. तेव्हां गारोड्यानें ह्मटलें कीं चेल्यानें मला फसविलें. हरकत नाहीं, याची खोड मोडतों ह्मणून पोतडींतून एक थोरली सुरी काढिली. ती हातांत धरून तो गारुडीही त्या दोरीला धरून वर गेला, तोही ढगांत दिसेनासा झाला, थोड्या वेळानें मोठमोठ्या आरोळ्या ऐकूं आल्या. इतक्यांत रक्त पडूं लागलें व नंतर त्या चेल्याचें शीर, हात पाय आणि शेवटीं धड आकाशांतून खालीं पडलें. पुढें थोड्या वेळानें तो गारोडी तोंडांत ती लालभडक सुरी धरून खालीं आला. तेव्हां त्याची मुद्रा उग्र व भयग्रस्त दिसत होती. खालीं आल्यावर चेल्याचे शरीराचे पडलेल्या अवयवाचे तुकडे घेऊन पोतडींत भरून तो जाऊं लागला, पण मध्येंच ती पोतडी खालीं ठेवतांच त्यांतून चेला हंसत जिवंत निघाला. हा प्रयोग पहाण्यास पुष्कळ युरोपियन मंडळी जमली होती. व त्यांनीं त्या गारोड्यास योग्य बक्षिसही दिलें.

**दुःखाची गोष्ट—** अर्काटचे नवाब दिल्ली दरबारास गेले होते, त्यांस खोकला होऊन ते बेजार झाले, यामुळें व्हाईसरॉय साहेबांची भेट घेऊन स्वस्थानीं परत जाण्यास निघाले. परंतु दुर्दैवानें रेल्वेच्या प्लाटफॉर्मवर त्यांना मृत्यूनें गांठिलें, यामुळें सर्वांस हळहळ वाटत आहे. दरबार लामला नाहीं खराच.

**खोटा मृत्यु—** नागपूरचे डेप्युटी पोस्ट मास्तर जनरल मि. लाल काका हे दिल्ली दरबारास गेले असतां ते वारल्याबद्दल खोट्या तारा त्यांच्या हेड असिस्टंटच्या सहीनें मध्य प्रदेशांतील सर्व पोष्ट मास्तरांना आल्या होत्या. त्यांत सर्व पोष्ट ऑफिसें बंद करावीं असें होतें व त्या प्रमाणें एक दिवस एक ऑफिस बंद करण्यांत आलें होतें. परंतु ह्या तारा खोट्या असल्याचें मागाहून उघडकीस आलें. हें कोणाचें कृत्य आहे हें बाहेर आलेंच पाहिजे. तरीपण आपण आनंदतुर्यांत असतांना आपण मलों आहों व आपल्या मृत्यूबद्दल हळहळणाऱ्या आपल्या आप्त मित्रांचीं दुःखवस्याचीं आलेलीं पत्रें आपणांस वाचावयास मिळतात असा अपूर्व प्रसंग क्वचितच घडतो. अशा अरुषांनीं आयुष्यवृद्धी होतें ह्मणतात याप्रमाणें आमचे लालकाका चिरायु होवोत.

**चमत्कारिक न्याय—** मद्रासेकडील गंजम येथले पोलिस सुपरिंटेंडेट साहेबांनीं आपली बूटपाटलोण भिजूं नये ह्मणून जवळच मिळालेल्या एका गरीब नेटिवाचे पाठीवर बसून त्याला ठोसे लगावून एका नदींतून पलीकडे गमन केलें ह्मणून त्यांजवर फिर्याद झाली; तेव्हां त्यांना निर्दोषी ठरवून गंजमचे मॅजिस्ट्रेटनें सोडून दिलें असें पहून त्यांचे खटल्याची फेर तपासणी करण्याचा मद्रासच्या हाय कोर्टानें गंजमचे मॅजिस्ट्रेटला हुकूम केला आहे.

**पहिलवान स्त्री—** मिस राबर्ट्स या नांवाची एक वरस मुलगी पंधरा वर्षांची असतां चांगली शक्तिमान ह्मणून प्रसिद्ध होती, परंतु अलीकडे कांहीं दिवसांपासून ती कसरतीचे खेळ करून दाखवूं लागली आहे. तिच्या जवळ नीव वाचविल्याच्या शिफारस पत्रा खेरीज १३० कुस्तींत मिळविलेलीं अजिंक्य पत्रें आहेत. ही ८ स्टोन वजनाची डंबेल रोज करीत असते. व १२ स्टोन वजनाच्या पुरुषांस एका हातानें आपल्या डोक्यावर उचलते.

**चमत्कारिक गाई—** रामसगांव शेवत येथें वैराग्याजवळ एक गाय आहे ती व्यालेली नसून रोज पावशेर दीड पावशेर दूध देते. मौजे सेवळ येथें गाय होती तिला निरण नव्हतें, ती स्तनावाटे लघवी करीत असे. मुद्दाम जाऊन खात्री करून घ्यावी ह्मणजे संशय फिटेल.

**भव्य देणगी—** राज्यारोहणाप्रीत्यर्थ जयपूरच्या महाराणी साहेबांनीं दुष्काळफंडाकडे एक लक्ष रुपयांची देणगी दिली आहे.

हस्ताक्षर ज्योतिषी—कोणाचेंही हस्ताक्षर पाहून त्याची वर्तणूक, उद्योग, आरोग्य वगैरे हकीकत अचूक सांगणारे गृहस्थ मुंबईत मांडवी येथें आले आहेत.

**अशोकाचे लेख—** अशोकाचे शिलालेख नंजम जिल्ह्यांत लोहगड पर्वतावर अशोकाचे कांहीं शिलालेख सांपडले आहेत. ते तसेंच कायम रहावेत ह्मणून त्याजवर पडवी वगैरे करण्यासाठीं सरकारानें १६८० रु. मंजूर केले आहेत. फार स्तुत्य होय.

**विक्षिप्त नवरा बायकोचा जोडा—** कलकत्याचे बाबू सुशीलचंद चक्रवर्ती यांच्या बायकोस सोन्याची खात्री करण्याचा नाद लागून ती एके रात्रीं हट्ट घेऊन रुसून निराळी निजली. यावरून सदर बाबू चिडून त्यांनीं तिच्या अंथरुणास आग लावून दिली.

**कडक हिंवाळा—** सध्यां युरोपांत चहूंकडे बर्फ पडत असून आमस्टरडम येथील सर्व कालवे थिजून गेले आहेत. व्हिएन्ना येथें थंडी २० अंश आहे. फ्रान्सांत तर इतकी थंडी सुटली आहे कीं कैक गरीब लोक गारठून रस्त्यांत पटापट मरून पडत आहेत.

**आश्चर्य—** मास्कोच्या एका व्यापाऱ्यानें आपल्या भागीदाराचे बायकोजवळ नुकतेंच व्हार्जिन मेरीच्या नावानें त्यांचें देणें आपण सर्व दिलें अशी खोटी शपथ घेतली तेव्हांपासून त्याचा उजवा हात पूर्णपणें लुळा होऊन पडला आहे, ह्मणून अशा ईश्वरी चमत्काराबद्दल मास्कोचे लोकांना अत्यंत आश्चर्य वाटत आहे.

**सेंट लुई येथील टोलेजंग प्रदर्शन—** अमेरिकेंतील सेंट लुई नांवाच्या शहरीं एक अद्भुत असें टोलेजंग प्रदर्शन सन १९०४ मध्यें एप्रिल महिन्यांत करण्याचें संयुक्त संस्थानांनीं ठरविलें आहे. सेंट लुई शहराची लोकसंख्या ७ लाख असून तेथील प्रदर्शन मोठें थोरलें व्हावें ह्मणून पारिसच्या तिप्पट व चिकागो येथील प्रदर्शनाच्या दुप्पट जागा त्या साठीं तयार करण्यांत आलेली आहे.

लखनौ येथें एक प्रोटेस्टंट चर्च बांधण्याच्या पब्लिक वर्कसचा विचार आहे, चर्चेस जर सरकारी खात्यांतून बांधलीं जावीं तर देवळें कां बांधलीं जाऊं नयेत? कारण हें इंग्रजीच राज्य आहे.

**सूट—** इंदूरसरकारानीं १६००००० रुपयांच्या थकलेल्या बाकीची राज्यारोहणाचे आनंदोत्सवार्थ सूट दिली. इंदूरच्या सरकारी दुकानाची १७००००० रुपयांची बाकी थकली होती तीही सोडण्यांत आली.

**स्वयंपाकी सोजीर—** सोजरांनीं आपला स्वयंपाक आपण करावा अशी नवी योजना करण्यांत आली आहे. याकरितां ७७००० रुपयांची मंजुरी देण्यांत आली आहे. सोजरांस स्वयंपाक करण्यास शिकविण्यास एक शाळा पुण्यास स्थापण्यांत येणार आहे.

**बिचारी व्हिक्टोरिआ—** मद्रासेस कोणी उदार गृहस्थांनीं राज्यरोहण समारंभाचा मोठा उत्सव केला. त्यांनीं एक भव्य कमान उभारली होती. तिच्यावर कोनांत 'वि. व्ही.' अशीं अक्षरें काढिलीं होतीं तीं पाहून एक गृहस्थ ह्मणाला, पी. व्ही. ह्मणजे पुअर व्हिक्टोरिया काय?

**खोड मोडी फजिती** पारिसचे वर्तमानपत्रकारांत एकप्रकारची मोठी चढाओढ सुरू आहे. नव्या व मनोरंजक हकीकती देण्याची जणूं शर्यतच सुरू झाल्यानें या पत्रांचे चालक नेहमीं अशा हकीकती मिळविण्याचे उद्योगांत असतात. तेथल्या एका पत्रकारानें नुकतेंच 'वेडे, त्यांचीं इस्पितळें, व तेथील त्यांची जीवनयात्रा' यांचें वर्णन वाचकांस देण्याचें योजिलें. पण इस्पितळांतील वितंबातमी त्यास मिळेना ह्मणून हा स्वारी वेड्याचें सोंग करून चाळे करूं लागली व अर्थातच त्यांस मोठ्या खुषीनें त्या इस्पितळांत ठेविलें. या गृहस्थांनीं सर्व माहिती जमविली व मग वेड गेलें या सबबीवर खात्री करून देऊन बाहेर सोडण्याकरितां डाक्टरजवळ विनंती सुरू केली; पण ४।८ दिवसांत वेड, साफ सुधारणें शक्य नसल्यानें जरी हे गृहस्थ सुबुद्धां प्रमाणें बोलत तरी ही एक वेडाचीच लहर आहे या सबबीवर त्यांस कोंडून ठेवण्यांत आलें! पुढें अनेक उपाय थकले तेव्हां एडिटरांनीं आपली हकीकत एका शिपायास अनुकूल करून घेऊन त्या मार्फत आपले पत्रांत प्रसिद्ध करविली! तेव्हां फार चळवळ उडाली आणि आतां या 'वेड्याचे तपासणी करितां कमिशन बसणार आहे.

———

REGISTERED N. No, 4

वर्गणी बद्दल
आकोल्यातील लोकांस..................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास........................ २
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ०१
दुसरे खेपेस.... .........८१

Town ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... 2 (with postage)
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 26 JANUARY 1903 NO 4

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २६ माहे जानेवारी सन १९०३ इ० अंक ४

## विज्ञापना

### ( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आम्ही मनांत योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आम्ही आमच्या वर्गणीदारांचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल या मानानें आम्ही वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाठव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून. मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५०६ पाहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ स. मा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई.

## जाहिर नोटीस

इलाख्यांतील निरनिराळ्या भागांतून पंढरपूर शहरांत यात्रेकरितां येणाऱ्या लोकांस कळण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येतें कीं पंढरपूर शहरीं प्लेग सुरू झाला आहे. व त्याचा प्रकार फार तीव्र आहे यात्रेकरितां येऊन फक्त एकादा दिवसच गांवांत राहिलेल्या कित्येक लोकांस आजार होऊन त्यांचा अंत झाल्याचीं ही उदाहरणें घडून आलीं आहेत. शिवाय शहरांतील बडवे पुजारी वगैरे लोक व इतर शहरवासी लोक गांव सोडून बाहेर राहण्यास गेले आहेत. अशा स्थितींत यात्रेकरितां बाहेर गांवच्या लोकांनीं येथें येणें अत्यंत धोक्याचें व गैरसोईचें आहे. येती माघी यात्रा बंद करण्याबद्दलही म्युनिसिपालिटी कडून सरकारास विनंती करण्यांत आली आहे. तरी अशा स्थितींत इलाख्यांतील व इलाख्याबाहेरील सर्व भागांतील लोकांस अशी विनंती करण्यांत येते कीं त्यांनीं यात्रेकरितां पंढरपुरास येऊं नये. कळावें, तारीख १६ माहे जानेवारी सन १९०३ इ.

S. B. SERDESAI

सेक्रेटरी पंढरपूर म्यु० पालिटी.

## नोटीस

वि. रा. नारायण कृष्णराव कान्नव राहणार तेल्हारे यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तू माझा दत्तक मुलगा असून हल्लीं तुझें वर्तन चांगलें नाहीं. वाईट रितीनें चालून पुष्कळसी जिनगीची नुकसान केली आहेस व करित आहेस तेल्हारे येथील माझे नवऱ्याचे मालकिची स्थावर जंगम जिनगी आहे त्यावर तुझी मालकी नसतां ती अफरातफरा करण्याचा तुझा विचार दिसत आहे. सदर्हू जिनगीचीं मी पूर्ण मालक आहे. तुझें वाईट वर्तन असल्यामुळें तुझा दत्तकाचा हक्क व त्यानवरून असलेला सर्व अधिकार कमी केला आहे. करितां या नोटिशीनें कळविते कीं सदर्हू जिनगी माझे मालकीची आहे ती तू कोणास गहाण ताबेगहाण किंवा फरोक्त करून देण्याचा तुला कोणतेही प्रकारचा अधिकार नाहीं. जो कोणी गहाण, फरोक्त व देणघेण करील तो सर्व व्यवहार बातल असे. व त्याबद्दल तुजवर योग्य इलाज केला जाईल. कळावें. तारीख १७।१।०३ इ०

सही

वेल्हाळबाई जवजे कृष्णराव कान्नव राहणार तेल्हारे निशाणी खुद्द हातची रेघ.

## जाहिर नोटीस

तमाम सर्व शेट साहू व्यापारी वगैरे सर्वत्र लोकांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं नारायण कृष्णराव कान्नव राहणार तेल्हारे हा माझा दत्तक मुलगा असून तो सुमारें ४ महिन्यापासून वाईट मार्गानें चालत आहे. माझे नवऱ्याचे मालकिची तेल्हारे येथील सर्व स्थावर जंगम इस्टेट त्याजवर त्याची कांहीं एक मालकी नसतां तो अफरा तफरा करण्याचे विचारांत आहे. सदर्हू जिनगीची मी पूर्ण मालकीण आहे. त्याचें वर्तन चांगलें नसल्यामुळें त्याचा दत्तकाचा हक्क व अधिकार कमी केला आहे. करितां सर्वत्रास या नोटिशीनें कळावें कीं जर कोणी त्याच्याशीं देणघेण करील किंवा तो माझी स्थावर जंगम जिनगी कोणी गहाण, फरोक्त घेईल तर तो व्यवहार रद्द असे कळावें. ता. १७।१।०३ इसवी.

सही

वेल्हाळबाई जवजे कृष्णराव कान्नव जात ब्राह्मण राहणार तेल्हारे निशाणी खुद्द. हातची रेघ.

## नोटीस

बेशमी कमळजा मर्द नारायण पाटील राहणार हिंगणें वाडेगांव तालुके बाळापूर पोस्ट–पातूर शेखबाबू हीसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, मौजे हिंगणें येथील घर, ज्या घरामध्यें सध्यां तुम्ही राहत आहा, तें मी तुमच्यापासून खरेदी घेऊन सुमारें ४।५ वर्षें होत आली. हें घर खरेदी घेतल्यापासून तुम्हांतच या घरांत आम्ही तुमचा घरोबा असल्यामुळें आजपर्यंत तुमच्यापासून कांहीं एक भाड्या ऐवजीं न घेतां राहूं दिलें. पण आतां आमचा मानस तसा नाहीं. तुम्ही आम्हांस भाडेचिठ्ठी करून दिल्याशिवाय यापुढें तुम्ही आमच्या घरांत राहूं नये. भाडेचिठ्ठी देणें नसल्यास ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत घर खालीं करून द्यावें. असें न झाल्यास रीतीप्रमाणें व्यवस्था केली जाईल. व या कामासाठीं जो खर्चवेच लागेल तो तुम्हापासून भरून घेतला जाईल. म्हणून अगाऊ नोटिशीनें कळविलें आहे कळावें तारीख २१ माहे जानेवारी सन १९०२ इसवी.

सही

राजाराम व० माधवराव देशमूख राहणार बेलूरखुर्द ता. बाळापूर निशाणी खुद्द हातची.

## नोटीस

बेशमी रघुनाथदास रामप्रताप साहू दुकान आकोला यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हाकडे माझी इनाम शेतें १००० रुपयाच्या दस्तऐवजा प्रमाणें ताबेगहाण आहेत व त्या शिवाय २०० रुपयांचा दुसरा एक ताबेगहाणाचा उंबरीच्या शेताचा दस्तऐवज आहे. या दोन्ही गहाण कर्जाची माझ्या मतानें फेड होऊन तुम्हाकडे उलट माझी बाकी फिरत असावी. तुमच्या मनांतून माझा शेती मजकडे परत देण्याचा हेतु दिसत नाहीं आणि म्हणून तुम्ही तिची दुर्व्यवस्था मांडली आहे तर या नोटिशीनें कळवितों कीं आठ दिवसाचे आंत माझ्या दोन्ही गहाणखताचा हिशोब मला कळवावा. तुमची बाकी कांहीं फिरत असल्यास मी ती देण्याला तयार आहे. या नोटिशीप्रमाणें व्यवस्था न केल्यास कोर्ट मार्फत दावा करून सर्व खर्चासुद्धां योग्य ती दाद मिळविण्यांत येईल कळावें. तारीख १० जानेवारी १९०३ इसवी.

सही ( फार्शीत )

शेर अली मुजाअतअली इनामदार राहणार आकोला दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी रा. रा. मंगनीराम नेतशीदास मारवाडी राहणार मेंडोल बुजरुक तालुके जळगाव, पोस्ट–पिंपळगांवकाळें यांस—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, मी तुम्हास सुमारें ९ वर्षांपूर्वी माझ्या दुकानेच कामकाजाबद्दल कुलमुकत्यारपत्र दिलें होतें. पण आतांशा तुमचें आमचें बरोबर पटत नाहीं व तुमचे काम आमच्या मनास येत नाहीं, सबब आज तारखेपासून तुमचें मुकत्यारपत्र रद्द केलें आहे. या पुढें तुम्ही आमच्या संबंधानें कोणचाहि देवघेवीचा व्यवहार करूं नये. केल्यास तो सर्व बातल असे. व त्याजबद्दलची सर्व जबाबदारी तुमच्यावरच राहील. कळावें. ता. २०।१।१९०३ इसवी.

( सही )

सदाराम सवाईराम मारवाडी राहणार मेंडोल दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मित्ती पौष वद्य १३ शके १८२४

## श्रीविठूची नगरी

श्रीक्षेत्र पंढरपूर येथें प्रति माघ मासीं शु० ११ स दूरदूरचे ठिकाणाहून मोठी यात्रा भरत असते. परंतु या वर्षी सदर क्षेत्रीं प्लेग सुरूं झाला आहे. प्लेगचें स्वरूपहीं इतकें तीव्र आहे कीं, कित्येक वेळां प्लेगनें लागल्यापासून २४ तासांचे आंतच रोगी दगावतो. उपाध्ये लोक वगैरे बहुतेक ब्राह्मण घरें बंद करून निघून गेले आहेत. दुकाने बंद असल्यामुळें कोणताही जिन्नस विकत मिळत नाहीं, म्युनिसिपालिटीनें यात्रा बंद करण्याविषयीं सरकारांत लिहिलें आहे. व वर्तमानपत्रांतून जाहिरातीनें प्रसिध्द केलें आहे. म्हणून ईशदर्शन होण्याचीहि शंका आहे. शिवाय कुडूवाडीसही ( बार्शीरोड ) हा रोग झपाट्यानें सुरूं आहेच असा सर्व प्रकारें यात्रेकरू लोकांच्या जिवास धोका आहे. एवढेंच नव्हे तर हल्लीं दूषित नसलेल्या कित्येक गांवांतूनही हें रोगबीज नेऊन पेरण्याचें पातक मात्र त्यांच्या माथीं येण्याची भीति आहे. तरी पंढरीभक्तांना आमची अशी सूचना आहे कीं, साल मजकुरीं माघ मासीं त्यांनीं पंढरपुरीं जाऊं नये.

## भावी स्थिती

वऱ्हाड प्रांत खालसा झाल्यामुळें त्याची भावी स्थिती कशी काय होते हें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. अनेक बातम्या लोकांच्या तोंडून ऐकूं येतात. कोणी ह्मणतात कीं हा प्रांत मुंबई इलाख्याला जोडणार, कोणी ह्मणतात कीं हा मध्यप्रांताला जोडणार आणि कोणी ह्मणतात कीं या वऱ्हाडच्या व्यवस्थेंत मुंबई, मद्रास, पंजाब, युनायटेडप्रांत, मध्यप्रांत व बंगाला इतक्या इलाख्यांच्या रचनेंत फेरफार होणार आहेत. कांहींहि झालें तरी आमच्या दृष्टीनें आमची प्रांतिक स्वतंत्रता लयास जाणार आणि त्याबद्दल आह्मांस मोठा खेद होणें साहजिक आहे. आतां आमच्या वऱ्हाडचा असा स्वतंत्र इतिहासच संपला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एकच गुलाबाची कुंडी खरी पण तिचें प्रेक्षणीय, सुंदर व मनोहर गुलाबाचें फूल किती तरी नामी! हा हृदयंगम नामीपणा एखाद्या मोठ्या बगीच्यांतील नानाविध कुंड्या पुढें दिसेल व अफाट बगीच्यांतील अनेक कुंड्यामध्यें ही एक कुंडी काय पृथकपणें दिसून पडणार आहे! वऱ्हाडचें हें स्वातंत्र्य गेलें आणि त्याबरोबर त्याचें सर्व वैभव गेलें असें आह्मी समजतों. मोठ्या वस्तूचें वैभव जातां जातां मनाला किती तरी वाईट वाटतें! आह्मी ह्मणतों कीं कदाचित कालान्तरानें आह्मी एका मोठ्या इलाख्यांत सामील झाल्या मुळें आह्मांस अनेक लाभ होतील. पण पुन्हां विचार येतो कीं त्या स्वतंत्रतेच्या एका सौख्या पुढें इतर काल्पनिकहि लाभ काःपदार्थ होत. पण आपणास विचारतो कोण!

वऱ्हाडच्या भावी स्थिती संबंधानें अनेक लोकवार्ता आहेत त्यांतील दोन गोष्टींमध्यें विशेष तथ्यांश आहे. स्टेट सेक्रेटरीकडे सर्व सूचना गेल्या आहेत आणि त्यांचा जसा हुकूम येईल तसा पुढें अंमल चालेल.

वऱ्हाडची परिस्थिती मध्यप्रांता प्रमाणेंच आहे आणि भूगोलदृष्ट्या मध्यप्रांतांतच वऱ्हाडाचा समावेश होईल असा विशेष संभव दिसतो. मध्यप्रांताकडे इकडील लोकांची विशेष ओढ दिसते आणि सर्वांस वाटतें कीं मुंबईपेक्षां मध्यप्रांतच बरा. सरकारी अंमल मुंबईकडे विशेष कडक आहे. तितका तो या प्रांतातील सरकार दरबारांत फिरणाऱ्या लोकांस नकोसा वाटतो. पण हा विचार कोत्या बुद्धीचा आहे आणि मुंबई इलाख्यास आपण जोडलों गेलों तर या प्रांताचा फायदा विशेष आहे असें आह्मांस वाटतें. पण लोकांचें समजूत आहे त्या प्रमाणेंच मध्यप्रांताला वऱ्हाड जोडण्यांत येईल अशी पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांस अंतस्थ बातमी आहे. मुंबई इलाख्याला वऱ्हाड प्रांत जोडण्याचा योग येईलच तर मराठी भाषा जेथें जेथें चालते अशा सर्व भागांचा स्वतंत्र इलाखा करण्यांत येईल व या इलाख्याला महाराष्ट्र अशी संज्ञा खरोखर विशेष शोभेल. ऐतिहासिक जुन्या महाराष्ट्राची कल्पना या नव्या इलाख्यानें फार चांगली येईल. असा महाराष्ट्राचा भाग निराळा करण्यांत येईल तर बालाघाटापर्यंतचा मराठी भाषा बोलणारा मुलूख मध्यप्रांतांतून घेऊन मुंबईकडे सामील केला जाईल. अशा रितीनें सिंधप्रांत पंजाबाकडे देण्यांत येईल कर्नाटकाचा बराच भाग मद्रासेला जोडला जाऊन, वायव्य प्रांताकडे त्याच्या दक्षिणेकडचा पुष्कळसा मुलूख घेण्यांत येईल; व मध्यप्रांताचा पूर्वभाग बंगाल सरकाराकडे देण्यांत येईल असें ह्मणतात. या रितीनें मध्यप्रांताचें सरकारच अजिबात नाहींसें होऊन सर्व इंडियाच्या पोट सरकारामध्यें पुष्कळच फेरफार होण्यासारखे आहेत. ही सूचना अंमलांत येण्याला पुष्कळच अडचणी येतील या अर्थी असा सार्वत्रिक समज आहे कीं मध्यप्रांतांतच वऱ्हाडचा समावेश बहुतकरून करण्यांत येईल. में होईल तें सुखकर होवो ह्मणजे झालें.

---

## सोन्याची पण सुरी

एका बाळाचे गोड बोल:—

"आजचा (ता. १·१·०३) दिवस मोठ्या आनंदाचा खरा! आज आपल्यास दरबाराची गंमत दृष्टीस पडेल, खाऊ खाण्यास मिळेल एक वेळतरी पोटभर जेवण्यास सांपडेल एखादें वस्त्र पांघरण्यास मिळेल; गाणें ऐकायास सांपडेल, व दीपोत्सव व दारूकामाची मजा पाहून मीं मोठ्या आनंदांत निजेन. असेच सर्व दिवस ईश्वर कृपेनें उगवोत."

अहाहा! काय या मुलांचे आनंदी आनंदाचे बोल आहेत. पण अरे मुला, तूं अज्ञान आहेस. तुला उद्यांची फिकीर वाटत नाहीं आहे. उद्या जेवण्यासाठीं तुला चांगलेच काबाडकष्ट केले पाहिजेत तरी सुद्धां पोटभर तुला मिळेल किंवा नाहीं शंकाच आहे, आजची मिठाई तुझ्या जिभेला गोड लागत आहे पण ती खरोखर फार कडू आहे. उद्या तुला याचबद्दल हजारपट दुःख होईल. उद्याला तुला मिठाई कोण देणार आहे! मुला तुला आजची आठवण उद्या न होईल तर तूं फार सुखी राहशील. अरे, हा दरबार, दारूकाम, दिपोत्सव हीं सुखें अठराविश्वें दारिद्र्य व पारतंत्र्य उजेडांत दाखवीत आहेत. हा सर्व उत्सव तूं विसरून जा. बाळा, उद्यां तें गाणें जाऊन तुलाच रडगाणें गायिलें पाहिजे

मुला, आह्मी मोठे सुखी आहों असें तुला वाटत असेल, पण तुझ्यांत आणि आमच्यांत कांहीं फरक आहे असें नाहीं. तुझ्या बरोबर आह्मांलाही रडगाणेंच गावयाचें आहे. आह्मीसुद्धां तुझ्या सारखेच मजूरदार बंदे नोकर आहों. आमची जीवनयात्रा तरी अशीच कष्टमय आहे. आमच्या अंगांत शक्ती नाहीं, तोंडावर नूर नाहीं, किंवा मनगटात जोर नाहीं. आह्मांस दुसऱ्याच्या तंत्रानेंच वागलें पाहिजे. आह्मी जन्मरोगी निपजलों आहोत, व आह्मास दुसरी तिसरी कांहींच औषधीं मानवत नाहीं. अरे, आमचे हातपाय बिलकुल चालत नाहींत, आणि ह्मणून आह्मास दुसऱ्याच्याच हातातोंडानीं पाणी प्यालें पाहिजे, दुसरे आमचा जसा लगाम ओढतील तसेंच चाललें पाहिजे. आणि आमच्या तोंडात ते जें कांहीं भरतील तेंच मोठ्या सौख्यानें, व आनंदानें गोड ह्मणून खाल्लें पाहिजे.

अरे! आमची काय कथा!. आमचे थोर थोर राजे बहादर तरी काय आहेत! ते नामधारी राजे आहेत, कळसूत्रीं बाहुलीं आहेत, आणि आडनांवाचे भटयोद्धे आहेत. त्यांना राजधोरण अवगत नाहीं, प्रजेचें हिताहित कळत नाहीं, आणि अंगीं सामर्थ्य किंवा बुद्धि नाहीं. ते आमच्या सारखेच परतंत्र व परवश आहेत. असे अज्ञान मांडलिक राजे व अशी त्यांची दुबळी प्रजा पाहून आपले महाराजाधिराज इंग्रज सरकारांनीं तरी काय करावें! त्यांनीं आमच्या सारख्या दुबळ्या, वेड्या व असमंजस लोकांपुढें खरोखर हात टेकले! ते आपण होऊन मोठ्या ममतेनें आपणांस पोटाशीं धरतात, आपल्या तोंडावरून हात फिरवतात आणि आपणांस सुखसंपदा प्राप्त व्हावी ह्मणून खटपटी करतात. पण आपल्या नशिबापुढें ते काय पळणार! ईश्वरा! त्यांस सुखी राख. त्यांस अशीच सुवासना दे, व त्यांची आमची ताटातूट कधींहि होऊं देऊं नको.

मुला, आजचा दिवस खरोखर तूं ह्मणाला स तसाच आनंदाचा व सोन्याचा आहे. पण काय करावें, आह्मांस उद्यांची आठवण होऊन जीवास चिंता जाळीत आहे. आजचे हे सुखसोहळे सोन्या सारखे गोड वाटतात पण ते सोन्याचे असले तरी उद्याची सुरी डोळ्यां पुढें फिरत आहे. उद्यांची आठवणच न होईल तर किती आनंदी आह्मी सुद्धा होऊं! ह्या आठवणीनेंच आमचा विरस होत आहे व तीच आमच्या आनंदात माती कालवीत आहे. मुला, तुझ्या सारखीच आमची अल्लड, बेपर्वा, व निर्धास्त अशी वृत्ती असती तर आह्मीहि तुझ्या सारखेंच स्वछंदी वृत्तीनें वागलों असतों. पण ह्या आठवणीचा शिमिरा कांहीं केल्या सुटत नाहीं. बाळा, आमच्या अंतःकरणांत जे हुरहुरहोळ मात्रे आहेत ते तूं ऐकूंच नकोच. तुझ्या तरी आनंदाच्या आड आह्मी कां यावें!

## सुरी पण सोन्याची.

पण जरीच उद्यांची सुरी दिसते आहे तरी ती सोन्याची आहे हें आपण विसरतां कामा नये. ही आठवण दुःखदायक वाटेल पण ती सुखाचीच आहे. आपण इतके दुःखशोकाच्या आवेशांत तें भावी सौख्य विसरून गेलों होतों. ही आठवण आपणांस उद्यांच्या मरणाचें स्मरण देऊन जागवीत आहे. ती पुढें ओढवणाऱ्या काळाची मगरमिठी सोडविण्यासाठीं आपणांस ओरओरडून जागे करीत आहे. ही आपले प्राण वाचविण्यासाठीं अमृताची कुपी घेऊन आपल्या पुढें उभी आहे. दुःखाच्या उमाळ्यानें ह्या आपल्या आठवणीला आपण टाकून बोललों हें बरें केलें नाहीं. हे आठवणी तुं मोठी आमची जिव्हाळ्याची जिवलग आहेस. तूंच आमच्या अंगांत संचार करून आह्मी दुःखात तळमळत मरत पडलों होतों तेथून उचलून सुखाशेच्या बंदगार ताटव्यांत आणून आह्मांस वारा घालून सावध करीत आहेस. तुझेच आमच्यावर अनंत उपकार आहेत. तुझा अव्हेर करून व तुझा पाण उतारा करून तुला धुडकून देण्याचा माझा मानस होता. व आजच्या आनंदराशींत तुझा विसर व्हावा ह्मणून इच्छित होतों पण तो आनंद आतां कमी न होता तुझ्या समागमें द्विगुणितच होईल. आजच्या सारखा उद्यांहि आनंद करण्याची शक्ति तूं आह्मांस देत आहेस. उद्यांचें मरण टाळण्यासाठीं अमृतवल्लीचा रस पाजीत आहेस. असें निराश होऊं नका, दम धरा कंबरा बांधा, उद्योग करा, आळस सोडा, दुही तोडा, एकी जोडा वगैरे इशाराचे शब्द तुझ्या बिगुल मधून निघून आमचे कानांत भरत आहेत. आमचा सुटलेला धीर पुन्हां आमच्या ह्रदयांत शिरत आहे. व एकाएकी सर्वांग वीरश्रीच्या रसस्वेदानें थबथबून जात आहे. हे प्रिय बहिणी, आठवणी, तुझीं तीं अमृततुल्य वाक्यें आह्मी कधीं विसणार नाहीं. तूं फुंकलेल्या मंत्रानें आमच्या विगलित झालेल्या व प्रेतकळा आलेल्या देशाचा देह सजीव होईल आणि तो आपल्या इंग्रज प्रभूच्या आशीर्वादानें आपल्या कीर्तीच्या चंदनाचा परिमल त्रिभुवनांत भरून सोडील. हे आठवणी, तुला आमचा अनन्यभावें प्रणाम असो. आह्मांत जेव्हां जेव्हां भूल पडेल तेव्हां तेव्हां तूं आमच्या पाठीशीं दत्त ह्मणून उभी राहत जा आणि उद्यांच्या मरणाची तशीच उद्यांच्या आनंदाची एकदम आठवण देत जा हीच प्रार्थना आहे.

---

## प्लेगाचें ऋण.

या रोगा संबंधानें प्रत्येकाला एक ऋण द्यावयाचें आहे. तें असें कीं, प्लेगाचा रोग ज्याच्या घरीं होतो त्यानें प्रथम ती गोष्ट जाहिर केली पाहिजे. आपल्यासाठीं सर्व दुनिया आहे ही गोष्ट कितीही खरी असली तरी दुनियेसाठीं आपलेपणा विसरला पाहिजे. आपल्याला तकलीफ होईल, आपलीं आजारी आप्तसोयरीं दवाखान्यांत पडतील, किंवा आपलीं घरेंदारें खालीं करावीं लागतील इत्यादि गोष्टी बाजूला ठेविल्या पाहिजेत आणि प्लेगाच्या संबंधीं वर्दी सरकारला प्रथम दिली पाहिजे. असें करण्या पासून बाकीच्या लोकांच्या प्राणाच्यास इशारा मिळतो. जो तो आपल्या सुरक्षितपणाची काळजी घेऊं लागतो. प्रत्येकानें आपली कामगिरि बजावली तर संसर्गानें होणारा दुष्परिणाम घडणार नाहीं. या रितीनें आपलाही मोठा फायदा होईल. दुसऱ्यानीं जें कर्तव्य तें केलें ह्मणजे, आपला जो फायदा होतो त्याबद्दल आपण दुसऱ्यांचे उतराई होण्यास शिकलें पाहिजे. प्लेगाच्या संबंधानें परस्परांस मदत करणें हें आपलें मोठें कर्तव्य आहे आणि तें या प्रसंगीं जर केलें नाहीं तर आपणास तें बजावण्याची पाळी कधींच येणार नाहीं.

---

## The Berar Samachar

MONDAY JANUARY
26 1903

A great change is coming upon us. It is the change in our thoughts and aspirations. We have seen that as one people we are sure to fall unless we make a general effort to stop the

killing and levelling tendancies of the Western civilization. We are politically *British* but we are far backward in standing shoulder to shoulder with the ruling classes from amongst the British people. Politically we should stand on an equal footing with the Englishman; but the sentiment that differentiates the rulers from the class of the ruled keeps alive all inequalities which are against us and all advantages go to the share of the ruling race. This spirit of inequality is the cause of our ruin and unless we rise and assert ourselves as worthy of the love and admiration of a common brotherhood we shall cease to live as one people. It is for us to fight out our own cause and wrist from the powerful hands of our English partners our proper share in the Government of our own empire. We have thus before us the great task of stamping out the sentiment of an Englishman who calls our people his inferiors and does not wish them to rise to his high level. The work of an Indian nationality lies in the fact of removing the inequalities under which we labour. The imperialism of the Government will be a great block in our way. We shall never succeed in this battle if we rest content with the hope of getting a lift at the hands of the government: we must work for ourselvs with implicit confidence in our own powers and without any hope of getting any help from outside. We should be independent in tone, character and position. This independence we will secure if we determine not to approach the Government with any request for service, gain or distinction. Honor does not come to him who is after it. It is like a maiden to be wooed with the greatest circumspection. We shall be independent a little by little when we shall begin to live aloof from the government and to work in our own way towards building up our material prosperity. Let us be beyond want and then and not till then the Government will see that there is a great thing to form friendship with the Indian people. We must build our own fortunes relying on our own industry and commerce which is the only strength and hope of our people. Ours should be something like a *coterie* and we should be true and faithful to our own manufactures and we must learn to do without the English ones. We have only the last chance in this connection. If we fail herein we fail every where, and if we do not rise to the exigencies of the time we shall for ever be undone. On this question of the day the learned Editor of the Bengalee observes thus:—

The increasing fiscal pressure on land, which has always been, and still is the main support of the people added to that imposed upon it by the rapid growth of population, the result of prolonged and emasculating peace, have been driving increasing numbers of the Indian population from it. The influx of foreign capital, fostered by an alien Government, in the interest of its own national enterprise, and needed for its own self—preservation in the growing commercial and industrial competitions of the world is gradually organising the cheap labour—forces of the country, for the development of their own industrial and commercial resources. And the inevitable result of it will be, unless these movements are checked at once to reduce the Indian population to a state of industrial serfdom, from which it will be almost absolutely impossible for them ever to recover. All our humanity has grown, so to say, out of our land; and to be cut off from the land, so completely and absolutely, as must result from the present policy of the State, and the growing enterprise of the ruling nation, would spell the death of all that we value most, whether morally or spiritually. It is in this view, indeed, that His Highness the Gaekwar evidently said that "the present economic problem is our last ordeal as a people. *It is our last chance.*" "Fail there, and what can the future bring us? We can only grow poorer and weaker, more depenpent on foreign help; we must watch our industrial freedom," the only freedom that we may yet claim for ourselves, or "fall into extinction and drag out a miserable existence, as 'hewers of wood and drawers of water' to any foreign power which happens to be our master." "Solve that problem and you have a great future before you, the future of a great people, worthy of your ancestors and of your old position among the nations." These are weighty words and they ought to arouse us all to the dangers of the present situation and to a sense of our paramount duty at the present time to help in so far as it lies in our power, the solution of this great problem.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— थंडीचें मान किंचित् कमी आहे. हवा रोगट झाली होती ती पुन्हां लवकरच आरोग्यकारक होईल असें वाटतें. दोन तीन दिवसांच्या मानानें आकोल्यास प्लेग होऊं नये असा समज आहे.

रा. रा. मारुती हरी क्लार्क आफ कोर्ट इलिचपूर हे ६ महिन्यांच्या रजेवर जात असल्यामुळें यांच्या जागीं आकोल्याचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. वामन संतो देशपांडे यांस इलिचपुरास बदलण्यांत आलें.

आणि बडनेरा कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. माधव गणेश यांस आकोल्यास क्लार्क आफ कोर्ट नेमून बडनेऱ्याच्या कोर्टाला रा. रा, शिवराम मोरेश्वर यांस क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आलें आणि अखेरच्या उमरावती स्मालकाज कोर्टाच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. पुरुषोत्तम व्यंकटेश देशमुख यास नेमण्यात आलें.

कुमार श्री हरभामजी रावजी डिपुटी कमिशनर हे दिल्ली दरबाराहून परत येतांना किरकोळ रजेवर काठेवाडांत जाऊन गेल्या मंगळवारीं येऊन आपल्या कामावर रुजू झाले. ते आल्या वेळेपासून लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं आतां प्लेग कांहीं येत नाहीं. याचा अर्थ असा कीं त्यांच्या राज्यांत प्लेगाच्या बंदोबस्ता पासून लोकांस कांहीं त्रास न होता लोक त्यांच्या व्यवस्थेला मोठे खूष असतात.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल एल बी. हे दिल्ली दरबारावरून परत गेल्या मंगळवारीं वऱ्हाडांत आले आणि ७ पोलिस कमिशना पुढें नागपुरास साक्ष देऊन उमरावतीला गेल्या शुक्रवारीं परत आले.

बऱ्हाणपूर कडून एक बाई पाय रस्त्यानें येत असतां तिला प्लेगाचा रोग झाला आहे असें कळल्यावरुन तिला प्लेगाच्या झोपडींत ठेवण्यांत आलें होतें व ती गेल्या शुक्रवारीं मरण पावली.

येथील डिपुटी कमिशनरचे फौजदारी क्लार्क रा. रा. गोपाळ सिताराम यांच्या घरीं त्यांचा भाऊ बळीराम हा प्लेगानें आजारी होऊन बाहेरून आला. तो मेला, त्याच्या मागून त्याची बायको मेली आणि शेवटीं राजश्री गोपाळराव हेही मेले. बिचारा बारमाहीचा कागद आज उद्यां तयार करीन अशा उमेदींत होता पण या उमेदींतच मृत्युंगत झाला. या तिन्ही मृत्यूमध्यें विशेष हा कीं एक मेला ह्मणजे नंतर दुसऱ्याला प्लेग होई प्लेगाचा रोगी मेल्यानंतर संसर्गाचा दोष उत्पन्न होतो असें वाटतें. आणि ह्मणूनच मृत्यूचा अंत्यविधी करितांना प्रत्यक्ष आंगाला त्वचेला स्पर्श करूं नये अशी डाक्टरची सूचना आहे.

पोलिस कमिशनाची बैठक उमरावतीस न होता नागपुरासच झाली. वऱ्हाडातील चार गृहस्थांच्या साक्षी झाल्या. कर्नल हेस्टिंग्स आणि मेसर्स सुवेल, रुस्तुमजी व खापर्डे या चौघांच्या साक्षी झाल्या. त्यांत मि: रुस्तुमजी फर्दुनजी यांची माहिती फार उत्कृष्टपणें ग्रथित केलेली होती असें ह्मणतात.

या जिल्ह्याचे अबकारीचे लिलाव आज पासून तीन दिवस पर्यंत आकोल्यास होणार आहेत.

कुमार श्री हरभामजी रावजी हे गेल्या शुक्रवारा पासुन आकोला तालुक्यांत फिरावयास बाहेर गेले आहेत. राजंदा, पुनोती व भैसपूर येथें मुक्काम करून अबकारीच्या हराजा निमित्त आज येथें आले आहेत.

कुमार श्री हरभामजी डेपुटी साहेब यांची स्वारी येत्या गुरुवारापासून खालील मुक्कामाला जाणार आहे:—

| तारीख. | गांव. |
|---|---|
| २९ जानेवारी | मोरगांव ( भाकऱ्याचें ) |
| ३०-३१ | आगर. |
| १ फेब्रुवारी | घुसर. |
| २ | आकोला. |
| ३-४ | बोरगांव ( मंजूचें ) |
| ५ | बारशीटाकळी. |
| ६-७ | महान. |
| ८ | सिंदी. |
| ९ | कोळंबी. |
| १०-११ | पिंजर? भेसांग. |

खामगांवाला प्लेगाचे मृत्यु १।२ किंवा २।३ माणसा पेक्षां अधीक जणांचे होत नाहींत. पण खामगांवा पासून तीन कोसावरील तिम्रव खेड्यांत पुष्कळच लोक मरतात.

शेगांवास प्लेगाचा कहर उसळला आहे १६।२४।२० असे दररोज मृत्यु घडतात.

बाळापुरासही दररोज १२।१६।१४ इतके प्लेगाचे मृत्यु होतात.

मि. जे. आर. ओमेडी एक्स्ट्रा असि. कमिशनर हे एक महिन्याच्या रजेवरून परत येऊन बडनेरा कोर्टावर रुजूं झाले. रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर हे मोर्शीच्या कोर्टाचा चार्ज या आठवड्यांत घेतील.

मि. आर. ए. सिम्पसन डिपुटी कमिशनर यवतमाल हे प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं लवकर रजेवर जाणार आहेत.

प्लेगाच्या भितीमुळें पुढील महिन्यांत भरणाऱ्या खालील ठिकाणच्या जत्रा बंद ठेवण्यांत आल्या:— आकोला जिल्हा—पातुर, मळसूर, धानोरा, तळेगांव, जांभ, व दहिहांडा.

वाशीम जिल्हा:— पारडी, आसा.

बुलढाणा जिल्हा:— गोमेधर.

अपघात— येथील सटवाईच्या विहिरींत एका बाईचें प्रेत तरंगत आहे पण याची खबर अद्यापपर्यंत पोलिसास असेलसें वाटत नाहीं.

येथील एका फ्याक्टरींतील यंत्राना एक मजूर तेल देत होता इतक्यांत त्याच्या अंगावरील कपडा यंत्रांत सांपडून त्याच्या चिंध्या चिंध्या होऊन एका निमिषात तो गतप्राण झाला! यंत्रालयांत; वापरणारांचे कपडे अंगाला तुस्त व तंग असे असले पाहिजेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥— |
| सोनें | २४।≡ |
| चांदी | ६९॥= |
| जवस | ११६ |
| जवारी | ४९ ते ५० |
| गहू | ८९ ते १०० |
| बाजरी | ६८ ते ७० |
| मीठ | ४ रु. मण |
| चणे | ३॥— रु. मण |
| तूप | ७॥= रु. मण |
| तेल | ६८= रु. मण |
| रुई | १३— १७॥ |

कि. दिवाणी दावा नंबर १ सन २१ / १९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकिट देण्याचा कायदा अक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हील जज्ज जिल्हा आकोले यांचे कोर्टात.

अर्जदार—सजन मर्द यशवंत पाटील वस्ती कानेगांव मु॥ तुकाराम नामदेव.

सर्वांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मैयत यशवंत वा॥ फत्तेसिंग याचे विठ्ठल वा निंबाजी मैयत वारीस पुत्र मगु व रघु यांचेकडेस येणें असलेले कर्ज रुपये ९१ चा दावा दिवाणी कोर्ट तेल्हारे येथें केला आहे तें कर्ज वसूल करण्या करितां सरटीफिकिट मिळावें ह्मणून तारीख १९ माहे जानेवारी सन १९०३ इ. रोजीं अर्ज केला आहे. व या अर्जाचे चौकशीची तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ. रोजीं मुकरर केली आहे तर सदहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे पुरावा सुद्धां आमचे कोर्टात अर्जदार याजला कां सरटीफिकिट देऊं नये याचे कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २२ माहे जानेवारी सन १९०३

V. N. Dandekar.
सिव्हिल जज्ज आकोला.

## वर्तमानसार

कर्झनी थाट—चितागांवच्या कमिशनरानीं दरबाराच्या वेळीं संभावित घराण्यांतील तीन मुलांना आपले "हुजरे" बनविलें होते; व एका जमीनदाराला आपला बॉडीगार्ड करून त्याच्या हातांत तरवार दिली होती रेल्वे मधून एक "गार्ड अफ आनर" आणवून तो शामिआनाच्या बाहेर उभा केला होता, व पोलिसचे लोक आणवून त्यांचे कडून त्या वेळीं सरबत्तीही उडविली. ढंका येथें शहरप्रवेश समारंभ करण्यांत आला, त्यावेळीं डेप्युटी कमिशनर वगैरे अधिकारी हत्तींच्या अंबाऱ्यांतून व मालदार चोपदारांच्या ललकाऱ्यांतून मिरवित गेले. हें अनुकरण बरें किंवा वाईट याचा उलगडा मनाशींच करावा.

तेगबहादराची गोष्ट—ते बहादर शिखांचा नववा गुरु होय. यास सन १६७६ ते औरंगजेब बादशाहानें पकडून ठार मारलें. शीख व मुसलमान यांचें वैर आहे. व या रागावरूनच या गुरूस अटक झाली. परंतु वध करण्यास कांहीं सबब पाहिजे. म्हणून यावर एक असा आरोप घातला कीं, हा जनानखान्याकडे पाहत होता. तसें करण्याचें कारण बादशहानें त्यांस विचारतां तो बोलला कीं मी जनानखान्याकडे पहात नव्हतो. दक्षिणेकडून कोणी गौरवर्णी लोक तुमच्या जनानखान्याचे पडदे फाडून तुमच्या राज्याचा नाश करण्यासाठीं येत आहेत तें मी पाहत होतो. हे शब्द उच्चारतांच त्याचा वध करण्यांत आला. ही तेगबाहादराची वाणी सत्तावन सालांत फळांस आली. म्हणून दिल्लीस समारंभ होतो. अशा या समारंभांत राजे महाराजे व साहेब लोक हजर असतां शिखांचा एक साधु उभा राहिला. व अनेक हावभावांनीं व वीरश्रीयुक्त भाषणांनीं त्यानें आपल्या गुरूचे व पूर्वजांचे पराक्रम वर्णन केले. ग्रंथ पूजा केली. आणि भजन करतां करतांच राष्ट्रगीत म्हटलें. हें गीत म्हणतांना तेथें असे उद्गार ऐकूं आले कीं, तेगबहादर गुरूनें गौरवर्णी लोक येऊन मुसलमान रियासतीचा नाश करतील म्हणून जें म्हटलें होतें तेच हे इंग्रज. म्हणजे आपला आवडता एडवर्ड बादशाह होय. हें ऐकून पाहुण्या साहेब लोकांनीं प्रेमाचें व अभिमानाचें केवढे भरतें आलें असेल, हें सांगणें नकोच.

मुंबई येथें साकरबाई ही आपली तेरा वर्षांची मुलगी व आकरा वर्षांचा मुलगा बरोबर घेऊन माटुंग्याच्या तलावावर स्नानास गेली. तेथें मुलांना काठावर सोडून देऊन आपण दुसऱ्या एका स्त्री बरोबर गोष्टी सांगत बसली. ती तेव्हां इतकी मग्न झाली कीं वीस मिनिटाचे आंत दोन्हीं मुलें बुडून मेली तरी तीस शुद्धि नव्हती. शेवटीं ऊर पिटवीत रडत ती एकटीच परत आली.

मुलांवर रंगांचे परिणाम—जर लहान मुलांच्या अंगांत करड्या रंगाचें आंगडें घातलें तर सर्व दिवसभर तें असंतुष्ट असतें; परंतु चांगल्या तांबड्या रंगाचें घातल्यास तें संतुष्ट आणि आनंदी राहतें. दोन वर्षांपासून चार वर्षांच्या मुलांला रंगाची विशेष बाधा होत नाहीं. लहान मुलांच्या तांबड्या रंगाच्या मोठी होत जातात तसतशी त्यांची निळ्या रंगाची आवड जास्त जास्त होत जाते.

अत्तरें पितात— लँडन येथें कित्येक लोक सुगंधी अत्तरें मद्या ऐवजीं पिऊं लागले आहेत. मद्यांची तूट पडायास लागली कीं काय कोण जाणे !

गवळ्यांनीं शपथ घेतली— कलकत्याच्या गवळ्यांनीं गाईचीं वासरें कसायास न विकण्याबद्दल शपथ घेतली आहे.

स्वदेशी कलोनवाटर— विलायतच्या कलोनवाटर सारखेंच कलोनवाटर तयार करण्याचा कारखाना दादर येथें एका पारशी गृहस्थांनीं काढला आहे. अनुभव पहावा.

खबूतरांची शर्यत— नुकतीच बंगलोर येथें लष्करांत युरोपियन लोकांनीं खबूतरांची शर्यत लाविली होती. सुमारें ४ तासांत खबूतरें १९० मैल प्रवास करितात असें ह्या शर्यती वरून दिसून आलें.

स्वप्नाचा दाखला— पांचगांव येथील राहणार बाबू पूर्णचंद्र चक्रवर्ती हे निद्रिस्थ असतां आपले डोळे कोणी फाडीत आहे असें त्यांना स्वप्न पडलें आणि जागे झाल्यावर त्यांना आतां मुळींच कांहीं दिसेनासें होऊन ते निखालस आंधळे झाले आहेत. काय चमत्कार आहे हा !

क्रूर कृत्य— अलीपूर येथें एक भिकारीण नित्य फार त्रास देते म्हणून एका व्यापाऱ्यानें तिच्या अंगावर घासलेट ओतलें व दुसऱ्यानें तिला पेटविली. त्यांजवर खटला चालणार आहे.

पाषाण वृष्टी— निजामशाहींत काळ्या दगडाची पाषाणवृष्टि राज्यारोहणसमारंभा दिवशींच झाली. ही तिकडील पांच चार गावच्या लोकांनीं पाहिली असें म्हणतात. खरें असल्यास एक चमत्कारच होय.

लोकोत्तर चमत्कार— कानपुरांत एका सुतारणीस एक मुलगी झाली असून तिला जन्मतःच तीन दांत व डोकीवर एके ठिकाणीं एक मोठें झुलूप आहे या विलक्षण मुलीला पाहण्यास तेथील नेटिव्ह व युरोपियन पुष्कळ मंडळी जात आहे व तिला पुष्कळ पैसा मिळत आहे.

दुसरा लोकोत्तर चमत्कार— मंडलेश्वरा जवळ कारोबा गांवीं एका गाईस वासरू झालें आहे. त्यास तीन डोळे, तीन नाकें व मस्तकावर शाळुंकेसह महादेवाची पिंडी आहे. आज महिना होत आला वासरू जिवंत आहे. हजारो लोक दररोज पाहण्यास जातात. तेव्हां बातमी विश्वसनीय आहे असेंच म्हटलें पाहिजे.

तिसरा एक अद्भुत चमत्कार— ट्राव्हनकोराकडील कारकूळप गांवीं एका बाईस एकदम चार मुलें झालीं आहेत. याच बाईस पूर्वीची नऊ मुलें आहेत.

वकिलांचा अर्ज—बरद्वानचे मॅजिस्ट्रेट आपणाशीं असभ्यपणानें वागतात असा तेथील वकिलांनीं बंगाल सरकाराकडे अर्ज केला आहे. व दाद लागेपर्यंत त्यांच्या कोर्टांतील कोणतेंही काम घ्यावयाचें नाहीं असा वकिलांनीं निश्चय केला आहे. इतरत्र वकि- एक प्रकारचा मोठा काळो आढळला आहे तो पक्षी नाळ्यांत पकडून त्यावर उपजीवन करितो.

दरमुखी मुलगी— कानपूर येथें एका कुंभारास एक मुलगी झाली होती तो ईश्वरांश असल्याबद्दल तिकडील लोकांची समजूत होऊन त्या मुलीस पाहण्यास मोठी यात्रा जमत असे. तिचें तोंड पुरी येथील जगन्नाथ देवाच्या मूर्ती सारखें होतें. हल्लीं ती मुलगी मरण पावली असून तिच्या जन्मस्थानीं एक देऊळ बांधण्याचें घाटत आहे.

मुद्दाम चौकशी— दिल्ली दरबारच्या निरनिराळ्या कार्यक्रमांत एतद्देशीय व परदेशीय लोकांस कोणच्या तऱ्हेनें वागविण्यांत आलें याची चौकशी ना० व्हाईसराय साहेबांनीं चालविली आहे म्हणतात,

मुंबईची आबझर्वेटरी कुलाब्याहून अलीबागेस नेण्याचें घाटत आहे यास ६०-७० हजार रुपये लागतील. मुंबईस विजेच्या ट्राम सुरू व्हावयाच्या आहेत, या साठीं ही योजना करावी लागणार आहे. नाहीं तर रेकार्ड मध्यें फरक पडेल.

खरे शौकी— दिल्लींत कोणत्या तरी निमित्तानें जाऊन आपल्या मंडळींत बढाई मिळविण्यासाठीं कित्येक बढाईखोरांनीं आपल्या इस्टेटी गहाण टाकून दिल्लीस प्रयाण केलें आहे असें म्हणतात.

आनंदोत्सवा निमित्य औदार्य—

(१) इंदूर सरकारनीं ९९ लक्ष + १७ लक्षांची सूट दिली.

(२) देरूचे इनामदारांनीं—४ हजार माफी दिली.

(३) जत संस्थानांतून— १९३ हजार.

(४) कोटा संस्थानांतून — ९० लाख.

(५) रामपूरचे नबाबांनीं — १॥। लाख.

वरील संस्थानिका सारख्या देणग्या सरकारनें देऊन प्रजा संतुष्ट केली पाहिजे आणि हेंच खरें प्रजावात्सल्य होय. नाहीं तर लांबलचक कोरड्या पदव्या देऊन पैसे मिळविणें हा व्यापारी कावा होय. ही सरदारी थोरवी नव्हे.

मुसलमान बंधूस उपदेश — मुसलमान लोकांना दुसऱ्या जातीतील लोकांशीं मिळून मिसळून प्रेमानें वागावें असा मुद्दाम ना० आगाखान यांनीं उपदेश केला आहे. आमचे मुसलमान बंधू हा सदुपदेश निरंतर मनांत वागवतील तर देशास चांगले दिवस लवकर लाभतील यांत शंका नाहीं.

वाघानें मारलें— भुसावळेस वडगांवकर सर्कस कंपनीतील मनुष्य वाघा बरोबर कुस्ती खेळत असतांना, त्याच्या पोटांत नखें खुपसून वाघानें त्यास मारलें व्याघ्रादि पशूंना कोणी कधींहि भरंवसा धरूं नये.

आंब्या एवढ्या गारा— १९ दिवसा खालीं पंढरपूरकडील वठार चिंचोलीस आंब्या एवढ्या गारा पडल्या. २ फूट लांब व ६ इंच जाड अशी एक गार मामलेदाराकडे मुद्दाम पाठविण्यांत आली.

बर्फास तोडून जाणाऱ्या आगबोटी— तयार होत आहेत यामुळें उत्तर ध्रुवाचा [illegible]

श्री. शिंदे सरकारची समयसूचकता— आग्रा येथें श्रीमंताच्या पदरी असलेले दोन गृहस्थाची गाडी मोडून ते यमुनेंत पडले हें पाहून तत्क्षणींच श्रीमंतांनीं नदींत उतरून त्यास बाहेर काढले. हा प्रसंग रात्रौ थंडी कडक असतांना झाला. श्रीमंतांनीं पोकळ राजेपणा एकीकडे ठेवून जें शौर्य व समयसूचकता वापरली अशी क्वचितच दृष्टीस पडते.

गंमत— दिल्ली दरबारच्या वेळीं लॉर्ड कर्झन साहेबांस एक पत्र आलें होतें, पण त्यावर बरोबर कॅंप नंबर लिहिलेला नव्हता. सबब 'इसम सांपडत नाहीं' असा शेरा घेऊन तें परत आलें. प्रत्यक्ष कर्झन साहेब सुद्धां त्या गर्दींत सांपडेनात !

हिरमुसलेली चर्या— दिल्ली दरबारच्या मिरवणुकींत कर्झन साहेबांचा चेहरा प्रफुल्लित होता, पण आपले निजामसरकारची मुद्रा अगदीं हिरमुसलेली दिसली म्हणतात. वऱ्हाड प्रांत हारविल्यावर लागलीच हे सुखसोहाळे गोड कसे वाटतील !

आश्चर्यकारक उपाय—मनुष्यास होणाऱ्या निरनिराळ्या व्याधी मानसिक व्यापाराच्या सहाय्यानें नाहींशा करणारे एक गृहस्थ रा. गणपतराव खरे हे नागपूर येथें आले आहेत डोकें दुखणें नाहींसें करण्याचा प्रयोग आम्ही स्वतः पाहून आम्हांस फार आश्चर्य वाटलें. सुमारें ५ मिनिटांत दुखणारानें माझें डोकें दुखत नाहीं म्हणून सांगितलें. लोकांनीं मुद्दाम अनुभव पहाण्यास विसरूं नये.

जन्माची सार्थकता झाली !—नाभाच्या वृद्ध राजानें बादशहाकडे जें मानपत्र पाठविलें त्यांत 'जन्मास येऊन जो समारंभ पाहण्याची मला इच्छा होती तो मी पाहिला. आतां मला सुखानें मरण येईल' असें एक वाक्य आहे.

अंगांत पाणी पाहिजे—प्लाटफार्मवर गर्दी फार झाल्यामुळें डा० शरच्चंद्र मल्लिक हे एका गर्विष्ठ ब्रिटिश आफिसरांचे बरेच नजिक आले, हें त्यांस खपलें नाहीं. म्हणून ते आपल्या तरवारीचें टोंक त्यांचकडे फेंकूं लागले. हें पाहून मलिक यांनीं लागलीच आपली काठी त्या ब्रिटिश आफिसरास मारली ! काळ्या अदमीचें हें विलक्षण पाणी पाहून ऑफिसर गोंधळून गेला; व थोडासा देहभानावर आल्यावर मग शब्दांची नुसती हमरीतुमरी सुरू झाली. पुढें दुसरे लोक मध्यें पडले व त्या युरोपियनानेंही माफी मागितली.

प्रतिज्ञाच कारण ?— उदेपूरखेरीज इतर ठिकाणच्या सर्व रजपूत राजांनीं मुसलमान राजांशीं शरीरसंबंध केलेले होते. उदेपूरच्या राण्यानें मात्र तें नाकारलें. मुसलमानांनीं शहरावर हल्ला करून कपटयुद्धानें त्यास जिंकलें; तेव्हां महाराणा अरण्यांतून हिंडूं लागला. या गोष्टीचे स्मरणार्थ अजूनही उदेपूरचे महाराणे आपल्या निजावयाच्या गादीखालीं झाडाचीं पानें घालतात ! यापुढें दिल्ली शहरांत जावयाचें तर विजयी वीर म्हणून जाईन असा त्यानें केलेला पण तेथील राण्यांनीं अजूनही पाळला आहे ! उदेपूरचे महाराणे समारंभास आले नाहींत याचें [illegible] आहे. [illegible] भाग पाहणाराच